**Lokmat 27.03.20**

## पोलिसांना १७ हजार ४७९ संदेश : ८० टक्क्यांना मिळाली परवानगी

# पोलीसदादा, जेवण नाही... औषधे नाहीत... गंभीर आजार आहे

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : लॉकडाउन केल्यानंतर गेल्या दोन दिवसांत पोलिसांच्या चार व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकांवर तब्बल १७ हजार ४७९ संदेश प्राप्त झाले. त्यापैकी तब्बल ८० टक्के संदेशांना पोलिसांनी परवानगी दिली.

आलेल्या संदेशांपैकी ७ हजार ६९५ संदेश तातडीचे होते. या संदेशांपैकी ५० टक्के वैद्यकीय सेवा परवानगी मिळावी, यासाठी होते. त्यामध्ये कॅन्सर, मधुमेह, अल्झायमर, डायलिसीस, गरोदर महिला वगैरेंबाबत होते. २० टक्के हॉस्पिटल सेवेसंदर्भात स्टाफ, नर्स, पॅथलॉजी यांच्या संदर्भात होते. त्यांना परवानगी दिली. तसेच ५ टक्के विद्यार्थी जे होस्टेलमध्ये राहत आहेत, त्यांची जेवणाबाबत गैरसोय होत असल्याबाबत होते.५ टक्के वयोवृद्ध आई-वडील, पत्नी, लहान मुले यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी परवानगीबाबत होते. त्यांना परवानगी दिली. पोलिसांच्या व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकावर आलेल्या संदेशापैकी आजच्या दिवसात ५ हजार ६८३ संदेशांना उत्तर देण्यात आले. कंपन्यांकडून आतापर्यंत २३३ ई-मेल पोलिसांना मिळाले असून त्यांना डिजिटल परवाने दिले जात आहेत. पोलिसांकडे ट्विटर, फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप व पुणे पोलिसांच्या संकेतस्थळावरुन सतत अद्ययावत माहिती दिली जात आहे. ट्विटरमार्फत सुमारे ५ हजार संदेश प्राप्त झाले. त्यावरुन नागरिकांनी विनाकारण रस्त्यावर फिरु नये, तसेच असलेल्या प्रतिबंधक सूचनांकडे लक्ष द्यावे, असे सांगण्यात आले.

### अस्वस्थ तरुणीची राहण्याची व्यवस्था

पुण्यामध्ये कामानिमित्त आई-वडिलांना सोडून एक तरुणी एका ठिकाणी राहत होती. त्या ठिकाणी ती एकटी असल्यामुळे अस्वस्थ होती. तिने पोलिसांकडे मदत मागितली. तिला योग्य मार्गदर्शन करुन तिच्या वडिलांमार्फत पुण्यामध्ये दुसरीकडे राहण्याची सोय झाल्यावर त्या ठिकाणी तिला पोलिसांनी जाण्यासाठी मदत केली असल्याची माहिती पोलीस उपायुक्त बच्चनसिंग यांनी दिली.

### बंगळुरुच्या दाम्पत्याला मदत

बंगळुरु येथून नुकत्याच पुण्यात बदली होऊन आलेल्या दाम्पत्याचे घरगुती सामान ट्रान्सपोर्टमध्ये अडकले होते. या ट्रान्सपोर्टशी संपर्क साधून त्या दाम्पत्याची समस्या निवारण केली.

नागरिकांच्या मदतीसाठी हेल्पलाईन
कलम १४४ लागू असताना
नागरिकांच्या मदतीसाठी

**व्हॉट्सअ‍ॅप नंबर**

९१४५००३१००, ९१४८००३१००,
८९७५९५३१००, ८९७५२८३१००

असे दिले आहेत. नागरिक या नंबरवर संपर्क साधू शकतात, असे आवाहन गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त बच्चनसिंग यांनी केले आहे.



**Pudhari 31.03.20**

## पोलिसांच्या मदतीला १८ हजार पी-फोर सुरक्षारक्षक

पुणे : पुढारी वृत्तसेवा

कोरोनाचे वाढते संक्रमण थांबविण्याकरिता अत्यावश्यक सेवा वगळता संपूर्ण देश लॉकडाऊन करण्यात आला आहे. या लॉकडाऊनचे काटेकोर पालन होण्याकरिता पोलिसांबरोबरच आता पुणे जिल्ह्यातील पोलिस प्रायव्हेट पार्टनरशिप प्रोग्रॅम (पी फोर) मधील सुमारे १८ हजार कर्मचारी कार्यरत आहेत.

**सुरक्षारक्षकांना घरगुती जेवण**

पी-४ चे मुख्य समन्वयक सचिन मोरे यांनी सांगितले की, सुरक्षारक्षकांना वेळेत पुरेसे जेवण मिळावे, यासाठी घरगुती पातळीवर काही कुटुंबांतील महिलांना त्यांच्या क्षमतेनुसार स्वयंपाक करून जेवण पुरवण्याची विनंती केली. त्या माध्यमातून आम्ही जवळपास तीन हजारांपेक्षा जास्त सुरक्षारक्षकांना दोन वेळचे जेवण पुरवत आहोत.

**Sakal 25.03.20**

## तातडीच्या सेवेसाठी पोलिसांकडून अ‍ॅप

पुणे, ता. २४ : जमावबंदी असतानाही नागरिक रस्त्यावर वाहने आणत असून, त्यांना अटकाव करण्यासाठी पुणे पोलिसांनी शहरातील वाहतूक बंद केली आहे. तथापि, आपत्कालीन बाब म्हणून पोलिसांनी Dial Rikshaw (९८५९११९८५९१) हे अ‍ॅप तयार केले आहे.

नागरिकांना या अ‍ॅप सेवेचा उपयोग रुग्ण वाहतूक किंवा अति तातडीच्या प्रसंगीच करता येईल. दुरुपयोग केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल, असे पोलिस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी सांगितले.

**Prabhat 25.03.20**

## महापालिका आणि पोलिसांची हेल्पलाइन सुविधा

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २४ - लॉकडाऊन कालावधीत महापालिकेने आणि पोलिसांनी खास हेल्पलाइन सेवा सुरू केली आहे. वेगाने वाढणाऱ्या करोना व्हायरसच्या संसर्गाला अटकाव घालण्यासाठी या संदर्भातील खबरदारी म्हणून ३१ मार्चपर्यंत लॉकडाऊन घोषित करण्यात आले आहे. मात्र या कालावधीत जीवनावश्यक वस्तू आणि सेवांचा पुरवठा सुरू ठेवण्यात आला आहे. या सेवा मिळविण्यात नागरिकांना अडचणी येऊ नयेत, यासाठी या हेल्पलाइन सुरू केल्या आहेत.

महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त आणि पुणे स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रुबल अग्रवाल यांनी याबाबत माहिती दिली. करोना व्हायरसमुळे सार्वजनिक आरोग्याच्या बाबतीत उद्भवलेल्या आणीबाणीच्या परिस्थितीत पुणेकर नागरिक अत्यावश्यक सेवांपासून वंचित राहू नयेत याची खबरदारी पुणे महापालिका घेत आहे, असा विश्वास अग्रवाल यांनी दिला.




लॉकडाऊनच्या कालावधीत अन्न, औष... अशा जीवनावश्यक वस्तूं... गरज नागरिकांना भासू शकते तसेच आरोग्याच्या दृष्टीने काही वैद्यकीय उपचारांची गरज भा... शकते.

अशा परिस्थितीत आपल्या भागातील संबंधित सेवा उपलब्ध नसल्यास नागरिकांना त्या सेवा कुठे उपलब्ध होतील याबाबतची माहिती देणे तसेच त्या सेवा उपलब्ध करून देण्या... आवश्यक ती मदत प्रशासकी... पातळीवर केली जाईल अशी ग्वाही, अग्रवाल यांनी दिली. या अनुषंगाने जीवनावश्यक सेवांबाबत मदत हवी असल्यास नागरिकांनी पुढील क्रमांकांवर संपर्क साधावा असे आवाहन अतिरिक्त महापालिका आयुक्त रुबल अग्रवाल यांनी केले आहे.

### व्हॉट्स अ‍ॅपवर करणार शंकांचे समाधान

पोलीस आयुक्तांच्या कलम १४४ आदेशाबद्दल तसेच वाहन विषयक आदेशाबद्दल नागरिकांच्या शंकांना उत्तर देण्यासाठी आणि विनंतीला प्रतिसाद देण्यासाठी पुणे पोलिसांनी खालील चार व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक निर्धारित केले आहेत.

९१४५००३१००
८९७५२८३१००
९१६९००३१००
८९७५९५३१००



या नंबरवर विनंती केल्यानंतर, आपल्या शंकांना अथवा सूट देण्याच्या विनंती वरील उत्तर, आपल्यालाच त्याच क्रमांकवरून संदेश स्वरूपात पाठवले जाईल. कृपया नोंद घ्या की, सूट ही केवळ अपवादात्मक परिस्थितीतच दिली जाईल, असे शहर पोलिसांतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. पुणेकरांनी याबाबत सहकार्य करावे असेही आवाहन करण्यात आले आहे.

**Loksatta 22.03.20**

# ‘जनता संचारबंदी’ची सक्ती नाही

## स्वयंस्फूर्तीने बंद पाळा; गरज असेल तरच बाहेर पडा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** करोनाच्या संसर्गाला अटकाव घालण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (२२ मार्च) जनता संचारबंदीचे आवाहन केले आहे. जनता संचारबंदी म्हणजे सक्ती नसून नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सर्व व्यवहार बंद ठेवायचे आहेत. नागरिकांनी गरज असेल तरच घराबाहेर पडावे. प्रशासनाकडून देण्यात आलेल्या आदेशांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

करोनामुळे शहरातील सर्व आस्थापना, दुकाने, खासगी कार्यालये बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सार्वजनिक कार्यक्रमांवर बंदी घालण्यात आली आहे. करोनाचा संसर्ग रोखण्यासाठी प्रशासनाकडून पाऊले उचलण्यात आली आहेत. जनता संचारबंदी म्हणजे सक्ती असून नागरिकांना घराबाहेर पडण्यास मज्जाव घालण्यात आला आहे, असा समज अनेकांच्या मनात आहे. करोनाचा संसर्ग रोखण्यासाठी प्रशासनाने नागरिकांना स्वयंस्फूर्तीने बंद पाळण्याचे आवाहन केले आहे. प्रशासनाने यापूर्वीच शहरातील जीवनावश्यक वस्तूंची दुकाने वगळता शहरातील अन्य दुकाने आणि व्यवसाय बंद करण्याचे आदेश दिले आहेत. प्रशासनाचे आदेश धुडकावणाऱ्या दुकानदारां विरोधात खटले दाखल करण्यास सुरुवात करण्यात आली आहेत.

पोलिसांनी प्रशासनाचे आदेश धुडकावणाऱ्या दुकानदारां विरोधात गेल्या दोन दिवसांत दोनशेहून आधिक खटले दाखल केले आहेत. याबाबत सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले,की करोनाचा संसर्ग टाळण्यासाठी नागरिकांनी स्वयंशिस्त पाळणे गरजेचे आहे. नागरिकांनी अनावश्यक गर्दी करु नये. ‘जनता संचारबंदी’ स्वयंशिस्तीने पाळावयाची आहे. नागरिकांनी शक्यतो घराबाहेर पडू नये. अत्यावश्यक काम असेल तरच घरातून बाहेर पडावे. शहरात प्रतिबंधात्मक आदेश यापूर्वीच लागू करण्यात आले आहेत. प्रतिबंधात्मक आदेश धुडकावणाऱ्यां विरोधात कारवाई करण्यात येत आहे.

> ‘जनता संचारबंदी’ स्वयंस्फूर्तीने पाळावयाची आहे. करोनाचा संसर्ग टाळण्यासाठी नागरिकांनी स्वयंशिस्त पाळणे गरजेचे आहे.नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे. गरज असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे. प्रशासनाने यापूर्वीच शहरात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. नागरिकांनी कायद्याचे पालन करावे.
>
> - डॉ. रवींद्र शिसवे, सहपोलीस आयुक्त

### फळभाजी बाजार बंद, परिणाम जाणवणार नाही

जनता संचारबंदीमुळे शहरातील घाऊक फळभाजी बाजार, मुसार बाजार रविवारी (२२ मार्च) बंद राहणार आहे. बाजारात फळभाज्या तसेच मुसार मालाची आवक नियमित आहे. नागरिकांना रविवारी घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे. किरकोळ व्यापाऱ्यांनी यापूर्वीच फळभाज्या, मुसार मालाची खरेदी करुन ठेवली आहे. दूध, औषध, फळभाजी, मुसार मालाचा तुटवडा जाणवणार नाही, अशी माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीकडून देण्यात आली आहे.

> जनता संचारबंदीचे नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने पालन करावे. कोणी अत्यावश्यक कामानिमित्त बाहेर पडत असेल तर त्याला त्रास देऊ नये,असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.
>
> - डॉ. के. वेंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे

**Mata 25.03.20**

# पोलिसांकडून शंकांचे व्हॉट्सअॅप समाधान

पुणे : ‘करोना’च्या पार्श्वभूमीवर शहरात लागू करण्यात आलेल्या संचारबंदीच्या कालावधीत नागरिकांच्या अडचणी व शंकांचे उत्तर देण्यासाठी पोलिसांनी व्हॉट्स अॅप क्रमांक सुरू केले आहेत. त्यावर नागरिकांनी शंका विचारल्यावर त्यावर उत्तर दिले जाणार आहे. मात्र, नागरिकांनी विनाकारण व अनावश्यक माहिती विचारू नये, अन्यथा अशा व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

‘करोना’ आजाराच्या पार्श्वभूमीवर राज्यात संचारबंदी करण्यात आली आहे. पुण्यातदेखील संचारबंदी लागू असून, नागरिकांना रस्त्यावर फिरण्यास बंदी घालण्यात आली आहे; तसेच शहरात वाहनांनाही बंदी केली आहे. अत्यावश्यक गोष्टी केवळ याला अपवाद असतील. काही नागरिक विनाकारण वाहने घेऊन फिरत आहेत, तर घरगुती वस्तू घेण्यासाठी गर्दी करत आहेत. त्या पार्श्वभूमीवर कडक पावले उचलण्यात आली आहेत.

संचारबंदीच्या काळात अनेक ज्येष्ठ नागरिक व रुग्णांना रुग्णालयात घेऊन जाणे किंवा इतर महत्त्वाची कामे असतात. त्या वेळी नागरिकांना अडचण होते. त्यामुळे नागरिकांना त्यांच्या शंका किंवा काही माहिती हवी असल्यास पुणे पोलिसांनी व्हॉट्स अॅप क्रमांक उपलब्ध केले आहेत. त्यावर नागरिक माहिती विचारू शकतील. नागरिकांनी केलेल्या विनंतीवर विचार केल्यानंतर सवलत देण्याच्या विनंतीबाबतचे उत्तर त्याच व्हॉट्सअॅप क्रमांकावरून संदेश स्वरूपात पाठवले जाणार आहे. सवलत ही केवळ अपवादात्मक परिस्थितीतच दिली जाईल, असे स्पष्ट केले आहे.



**हे आहेत क्रमांक...**

- ९१४५००३१००
- ८९७५२८३१००
- ९१६९००३१००
- ८९७५९५३१००

## Mata 23.03.20

# 'होम क्वारंटाइन'वर पोलिसांची नजर

### शहर परिसरात १३६ पथकांद्वारे तपासणी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पुणे पोलिसांकडून जिल्हा प्रशासनाला सर्वतोपरी मदत केली जात आहे. 'होम क्वारंटाइन' करण्यात आलेले नागरिक स्वयंशिस्त पाळत आहेत की नाहीत, याची माहिती घेण्यासाठी पोलिसांच्या १३६ पथकांद्वारे लक्ष ठेवले जात आहे. त्यासाठी प्रशासनाकडून होम क्वारंटाइन असलेल्यांची यादी घेतली आहे,' अशी माहिती पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी दिली आहे.

'करोना'च्या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्तालयात सुरक्षा बैठकीला पोलिस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अतिरिक्त पोलिस आयुक्त डॉ. संजय शिंदे, पोलिस उपायुक्त मीतेश घट्टे उपस्थित होते. राज्यात 'करोना'चा प्रादुर्भाव वाढत असून त्यावर उपाययोजना करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून प्रयत्न केले जात आहेत. परदेशवारी करून आलेल्या नागरिकांना सक्तीची विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. त्यानुसार गेल्या एका महिन्याभरात आंतरराष्ट्रीय प्रवास करणाऱ्यांची माहिती घेऊन वैद्यकीय चाचणीला प्राधान्य देण्यात आले. त्यासाठी प्रशासनाकडून संबंधिताची यादी करून विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. होम क्वारंटाइन असलेले काही नागरिक बाहेर फिरत असल्याचे प्रशासनाला आढळले. त्यामुळे संबंधितावर कारवाई करण्यासाठी पोलिसांची मदत घेतली जात आहे. पुणे पोलिसांच्या १३६ पथकांद्वारे होम क्वारंटाइन करण्यात आलेल्या नागरिकांच्या घरी थेट भेट दिली जाणार आहे. त्यानंतर संबंधिताची जनजागृती करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश दिला जाणार असल्याची माहिती डॉ. के. व्यंकटेशम यांनी दिली.



#### पोलिसांकडूनही सन्मान

करोना व्हायरसच्या प्रतिबंधासाठी दिवसरात्र काम करणारे डॉक्टर, परिचारिका, रुग्णवाहिका चालक यांच्या कार्यांचे कौतुक करण्यासाठी पुणे पोलिस आयुक्तालयाच्या गेटवर पोलिसांनी टाळ्या वाजून सन्मान केला. पुणे पोलिसांच्या बँड पथकानेदेखील वादन करून सन्मान केला.

#### पुण्यात सोमवारी पहाटेपर्यंत संचारबंदी

'करोना'च्या पार्श्वभूमीवर पुणे शहरात रविवारी रात्री नऊ ते सोमवारी पहाटे पाचपर्यंत संचारबंदीचे आदेश पोलिस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी काढले आहेत. त्यामुळे रस्त्यावर फिरणे, सार्वजनिक ठिकाणी थांबण्यास बंदी राहणार आहे. राज्य सरकारच्या आदेशानुसार पुणे आणि पिंपरी-चिंचवड आयुक्तालयातंर्गत १४४ कलम लागू करण्यात आले आहे. पोलिस महासंचालक सुबोधकुमार जैस्वाल यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे पुणे पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम आणि पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्त संदीप बिष्णोई यांच्याशी संवाद साधला. त्यांच्या आदेशानुसार दोन्ही शहरात पाचपेक्षा जास्त नागरिकांना एकत्र जमाण्यास बंदी घालण्यात आली आहे. यामध्ये जीवनावश्यक वस्तूंना वगळण्यात आले आहे.

## Sakal 30.03.20

# लक्ष ठेवण्यासाठी पोलिसांकडून ॲप

### प्रत्येक होम क्वारंटाइन व्यक्तीला डिजिटल हजेरी सक्तीची

**पुणे, ता. २९ : परदेश प्रवास करून आलेल्या, मात्र त्या प्रवाशांना कोरोना विषाणू संसर्गाची लक्षणे आढळून न आल्याने त्यांना १४ दिवसांसाठी त्यांच्या राहत्या घरी विलगीकरण (होम क्वारंटाइन) केल्यानंतरही संबंधीत व्यक्ती समजामध्ये फिरत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी पुणे पोलिसांनी 'महाराष्ट्र होम क्वारंटाइन ट्रैकिंग सिस्टिम' (महा एचक्युटीएस) हे स्वतंत्र मोबाईल ॲप तयार केले आहे. त्यामुळे या व्यक्ती पोलिसांच्या ऑनलाईन देखरेखीखाली राहणार आहेत.**

शहरामध्ये कोरोनाचा संसर्ग झालेल्या व्यक्ती आढळल्यानंतर जिल्हा व पोलिस प्रशासनाकडून कोरोनाचा संसर्ग व प्रादुर्भाव वाढू नये, यासाठी विविध पद्धतीच्या उपाययोजना करण्यात आल्या होत्या. त्याचाच हा एक भाग आहे.

दरम्यान, पुणे पोलिसांनी होम क्वारंटाइन व्यक्तींवर लक्ष ठेवण्यासाठी १५२ पोलिस पथके तयार केली होती. प्रत्येक पथकात दोन कर्मचारी असून, त्यांना गोल्व्ज,मास्क व सॅनिटायझर अशा आवश्यक सुविधाही उपलब्ध करून दिल्या होत्या. या पथकाने शहरातील १२७६ व्यक्तींच्या घरी जाऊन तो हजर असल्याची खात्री केली होती.

दुसऱ्या टप्प्यात घरी मिळून आलेल्या ८२१ व्यक्तींचा दररोजचा संपर्क टाळण्यासाठी पोलिसांनी त्यांना व्हॉट्सअप व्हिडिओ कॉल करून त्यांच्या घरातील विशिष्ठ जागेवर उभे राहून उत्तर देण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसेच त्या व्यक्ती घराबाहेर पडतात का? याची खातरजमा करण्यासाठी शेजारी कुटुंबाची मदत घेण्यात येत आहे.

#### असे आहे 'महा एचक्यूटीएस' !

पुणे पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांच्या संकल्पनेतून पुणे पोलिसांनी बंगळूर येथील कोटा व्हिजन लॅबच्या मदतीने फेशिअल रीकग्नेशन सिस्टिम (Facial Recognition system) आधारित स्वतंत्र मोबाईल ॲपकेले आहे. हे ॲप http://106.51.74.239:8083 / download_apk या वेबसाईटवरुन कार्यान्वित करता येते. त्यावर विभागीय आयुक्त कार्यालकडील संकलित केलेली माहिती संबंधीत वेबसाईटवर नोंदणी करण्यात आली आहे.

**होम क्वारंटाईन व्यक्तीवर लक्ष ठेवण्याचे काम पुणे शहर पोलिस करीत आहेत. त्यासाठी 'महा एचक्यूटीएस' या मोबाईल ॲप ची मदत मिळणार आहे. त्याद्वारे त्यांच्यावर लक्ष ठेवणे, शोध घेणे व त्यांना सूचना देणे शक्य होणार आहे. राज्यातील हा पहिलाच प्रयोग आहे.**

– रवींद्र शिसवे, पोलिस सहआयुक्त

**Mata 28.03.20**



नागरिकांकडील 'एसएमएस'वरील डिजिटल पास पाहूनच पोलिस त्यांना तातडीच्या कामास जाण्याची परवानगी देत आहेत.

# तातडीच्या कामासाठी 'एसएमएस'वर पास

पुणे : करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लागू करण्यात आलेल्या जमावबंदी व वाहनबंदीमध्ये गरजू नागरिकांना मोबाइल फोनवर 'एसएमएस'च्या माध्यमातून डिजिटल पास दिला जाणार आहे. नागरिकांनी पोलिसांना तो एसएमएस दाखविल्यानंतर त्यांना काहीही अडचण येणार नाही.

'करोना'चा पुण्यात प्रादुर्भाव वाढतो आहे; तसेच, संपूर्ण देशात 'लॉकडाउन' करण्यात आले आहे. पुणे पोलिसांनी शहरात जमावबंदी, वाहनबंदी लागू केली आहे. जीवनावश्यक सेवांना यातून वगळले आहे; तसेच नागरिकांना तातडीची निकड असल्यास बाहेर पडण्याची परवानगी दिली जात आहे. त्यासाठी अडचणी, शंका विचारण्यासाठी व्हॉट्सअॅप क्रमांक व ई-मेल आयडी दिले आहेत. नागरिकांना बाहेर पडणे आवश्यक असल्यास त्यांना पुणे पोलिसांच्या www.punepolice.in या वेबसाइटवर सर्व तपशील भरून परवानगीसाठी अर्ज करावा. पोलिस त्या अर्जातील सर्व माहिती पडताळून पाहतील. त्यानंतर अर्ज मंजूर झाल्यास नागरिकांना क्यूआर कोड असलेला एक 'एसएमएस' पाठविला जाईल. पोलिसांनी अडवल्यास हा 'एसएमएस' नागरिकांनी पोलिसांना दाखविणे आवश्यक आहे. हा 'एसएमएस' दाखविल्यास नागरिकांना कामासाठी जाण्यास परवानगी देण्यात येईल, अशी माहिती गुन्हे शाखेचे उपायुक्त बच्चनसिंग यांनी दिली.

**Prabhat 31.03.20**

## डिजिटल पासची पडताळणी...



पुणे : संचारबंदी काळात महत्त्वाच्या कामांबाबत नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी पुणे पोलिसांनी डिजिटल पास देणे सुरू केले आहे. अशा वाहनचालकांची पडताळणी ठिकठिकाणी केली जात असून अनावश्यक फिरणाऱ्यांना दंड आकारला जात आहे.

३३ हजार अर्ज : अनावश्यक कारणांसाठीचे अर्ज फेटाळले

# 'क्युआर कोड'द्वारे २ हजार ४०० जणांना डिजिटल पास

पुणे, दि. ३० - संचारबंदीच्या काळात महत्त्वाच्या कामांबाबत नागरिकांची गैरसोय होऊ नये, पुणे पोलिसांनी वेगवेगळ्या महत्त्वाच्या कारणांसाठी सुरू केलेल्या डिजिटल पास व परवानगीच्या सेवेला २४ तासांत ३३ हजार २३४ जणांनी प्रतिसाद दिला. त्यापैकी २ हजार ४०३ जणांना पोलिसांनी 'क्युआर कोड'द्वारे परवानगी दिली; तर अनेकांनी किराणा, भाजीपाला, दूध आणण्यासाठीही परवानगी मागितली होती, मात्र त्यासाठी परवानगीची गरज नसल्याने ते अर्ज बाद करण्यात आले.

करोनाच्या पार्श्वभूमीवर शहरामध्ये संचारबंदी लागू केली आहे. याकाळात पुणे पोलिसांनी वेगवेगळ्या महत्त्वाच्या कारणांसाठी घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांसाठी डिजिटल पास/परवानगीची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या सेवेला शुक्रवारी दुपारी साडेचार वाजता सुरुवात झाली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी शनिवारी दुपारी साडेचारपर्यंत ३३ हजार २३४ जणांनी प्रतिसाद दिला. त्यापैकी २ हजार ४०३ जणांना पोलिसांनी 'क्युआर कोड'द्वारे परवानगी दिली. तर १ हजार ९७... अर्ज नामंजूर केले, अशी... पोलीस उपायुक्त (गुन्हे)... सिंग यांनी दिली.

> **डिजिटल पास/परवानगी मिळवण्यासाठी इथे भरा माहिती www.punepolice.in**

> " डिजिटल परवानगी/पास... सेवा फक्त महत्त्वाच्या क... अडथळा येऊ नये यासा... दिली आहे. जीवनावश्यक... वस्तू आणण्यासाठी पायी... जाणाऱ्यांना परवानगीची... नाही. नागरिकांनी महत्त्वा... कामे असतील तरच डिजि... परवानगीसाठी अर्ज करा...
>
> – बच...
> पोलीस उपायुक्त...

**Samana 23.03.20**

# होम क्वारंटाइनवर पोलिसांची करडी नजर

पुणे, दि. २२ (प्रतिनिधी) - कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पुणे पोलिसांनी कंबर कसली आहे. त्या पार्श्वभूमीवर होम क्वारंटाइन असलेले नागरिक स्वयंशिस्त पाळत आहेत की नाही, या संदर्भात माहिती घेण्यासाठी पोलिसांच्या १३६ टीमद्वारे लक्ष ठेवले जाणार आहे. त्यासाठी पालिकेकडून होम क्वारंटाइन असलेल्यांची यादी घेतली जाणार आहे, अशी माहिती पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी दिली आहे.

पोलीस आयुक्तालयात आयोजित सुरक्षा बैठकीला सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, पोलीस उपायुक्त मीतेश घट्टे उपस्थित होते.

केंद्र आणि राज्य सरकारकडून प्रयत्न केले जात आहेत. विशेषत: परदेशवारी करून आलेल्या नागरिकांना सक्तीची विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. त्यानुसार मागील एक महिनाभरात आंतरराष्ट्रीय प्रवास करणाऱ्यांची माहिती घेऊन वैद्यकीय चाचणीला प्राधान्य देण्यात आले. त्यासाठी महानगरपालिकेकडून संबंधितांची यादी करून विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे.

होम क्वारंटाइन असलेले काही नागरिक फिरत असल्याचे प्रशासनाला दिसून आले आहे. त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्यासाठी पोलिसांची मदत घेतली जात आहे. पुणे पोलिसांच्या १३६ टीमद्वारे होम क्वारंटाइन नागरिकांच्या घरी धडक दिली जाणार आहे. त्यानंतर संबंधितांची जनजागृती करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश दिला जाणार असल्याचे डॉ. के. व्यंकटेशम यांनी सांगितले. दरम्यान, कोरोना व्हायरसच्या प्रतिबंधासाठी काम करणारे डॉक्टर, परिचारिका यांच्या कार्याचे कौतुक करण्यासाठी पोलिसांनी टाळ्या वाजवून सन्मान केला.

> **पुणे-पिंपरी-चिंचवडमध्ये आजपासून कर्फ्यू लागू**
>
> ■ राज्य सरकारच्या आदेशानुसार पुणे आणि पिंपरी-चिंचवड आयुक्तालयांतर्गत १४४ कलम लागू करण्यात आले आहे. पोलीस महासंचालक सुबोधकुमार जैस्वाल यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे पुणे पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम आणि पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त संदीप बिष्णोई यांच्याशी संवाद साधला. कर्फ्यूमधून जीवनावश्यक वस्तूंना वगळण्यात आले आहे. वस्तूंचा साठा करून गैरफायदा घेणाऱ्यांविरुद्ध कारवाइचा इशारा पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी दिला.

# पोलिसांनाही नागरिकांची काळजी !



**कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात सध्या संचारबंदी आहे. या वेळी पोलिसांची नेमकी काय भूमिका असेल, याबाबत पोलिस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्याशी साधलेला संवाद...**



डॉ. रवींद्र शिसवे

*** संचारबंदीत पोलिसांकडुन नागरीकांना मारहाण केली जात आहे. सर्वसामान्य नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंसाठी झगडावे लागत आहे, काय आहे पोलिसांची भुमिका ?**

**डॉ. शिसवे :** कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू नये, लोकांचा त्यापासून बचाव व्हावा, यासाठी कलम १४४ नुसार संचारबंदी लागू करण्यात आली. मात्र नागरिकांना त्याचे गांभीर्य नाही. त्यामुळे पोलिसांकडुन गर्दी कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा वेळी नागरिकांनीही घराबाहेर पडले नाही पाहिजे. तरीही नागरिक रस्त्यावर उतरत आहेत. सिंहगड रस्ता परिसरामध्ये पोलिसांनी नागरिकांना मारहाण केल्याचा प्रकार पुढे आला आहे. त्याची आम्ही गांभीर्याने दखल घेतली आहे. संबंधितावर कारवाई होईल. तसेच पोलिसांनी नागरिकांना मारहाण करु नये, त्यांना समज द्यावी किंवा विनाकारण फिरणाऱ्यावर गुन्हे दाखल करावेत, अशा सूचना दिल्या आहेत. अन्नधान्य, भाजीपाला व अन्य जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा कायम राहणार आहे. त्यामध्ये खंड पडणार नाही. ही व्यवस्था अधिक चांगली व्हावी, यासाठी पोलिस प्रयत्न करीत आहेत.

**तुम्हाला अडचण असल्यास**
**खालील व्हाट्सअप क्रमांकावर संपर्क साधा**

| | |
|---|---|
| ९१४५००३१०० | ८९७५२८३१०० |
| ९१६९००३१०० | ८९७५०५३१०० |

*** नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे, यासाठी पोलिस प्रयत्न करत आहेत का ?**

- पोलिसांकडून मारहाणीचा एक प्रकार घडला. त्यामुळे पोलिसांची इतर चांगली कामे झाकली गेली. नागरिकांना कोणतीही अडचण येऊ नये, त्यांना त्रास होऊ नये, यासाठी पोलिस विविध उपाययोजना करीत आहेत. ज्यांना अडचण आहे, प्रश्न आहे, अशा नागरिकांसाठी आम्ही एक व्हॉटसअप क्रमांक दिला होता. त्याला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे आम्ही चार व्हॉटसअप क्रमांक दिले. संचारबंदीनंतर आतापर्यंत त्यावर पाच हजारांहून अधिक फोन आले. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे त्यांना मिळत आहेत. ६० ते ७० टक्के नागरिकांच्या अडचणी सोडविल्या आहेत. नागरिकांना मर्यादित कालावधीसाठी तत्काळ 'डिजिटल परवाना' देऊन त्यांचे प्रश्न सोडविले जात आहेत. पोलिसांनी आत्तापर्यंत ५००० नागरिकांमध्ये मास्क, सॅनिटायझर वापराबाबत जागृती केली आहे.

*** पोलिसांमुळे नागरिकांना जीवनावश्यक वस्तू मिळविण्यात अडचण निर्माण होतेय का ?**

- सरकारी यंत्रणा पुरवठा साखळी कायम रहावी, यासाठी अत्यावश्यक सेवेतील वाहने, दुकानदार, माथाडी यांची मदत घेत आहे. त्यामुळे नागरिक जीवनावश्यक वस्तुंपासून वंचित राहणार नाहीत. अत्यावश्यक सेवा साखळी कदापी तुटणार नाही.

*** बंदीच्या आदेशाची अंमलबजावणी कशी करीत आहेत**

- शहरातील लाखो लोकांपर्यंत पोचण्यासाठी प्रसार माध्यमे महत्वाचा दुवा आहे. त्यामुळे आम्ही सातत्याने या माध्यमांच्या संपर्कात आहोत. याबरोबरच केबल, एफएम रेडीओ, सोशल मिडिया यांसारख्या माध्यमांद्वारे लोकांपर्यंत संदेश पोचविले. आज शहरामध्ये १८० पेक्षा जास्त नाके उभारले आहेत. तेथे वाहनचालकांना विचारणा करुन त्यांना पुढे सोडले जात आहे. ज्या वाहनांना सवलत आहे, अशी वाहने वगळता इतर वाहने कमी आहेत. बंदी असतानाही जे विनाकारण रस्त्यावर फिरत आहेत, त्यांना अडवुन त्यांची छायाचित्रे, मोबाईल क्रमांक घेऊन त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. हे सर्व करण्याचे कारण नागरिकांनी कुठल्याही अतिमहत्वाच्या कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आहे.

*** बंदीच्या आदेशानंतर नागरिकांबाबतची काय निरीक्षणे आहेत ?**

- बंदीच्यानंतर बहुतांश आस्थापने बंद झाली. त्यामुळे नागरिक रस्त्यावर येण्याचे प्रमाण कमी झाले. काही नागरिक संचारबंदीचे प्रमाणिकपणे पालन करीत आहेत. नागरिकांकडुन चांगला प्रतिसाद मिळत आहे. मार्केट यार्ड, मंडई व शहरातील झोपडपट्टी परीसरात बंदीच्या आदेशाचे पालन होत नसल्याचे चित्र आहे. तिथे कडक कारवाई केली जात आहे. सध्या रस्त्यावर ज्या गाड्या दिसत आहेत, त्या सर्व आवश्यक सेवेतील किंवा ज्यांना सुट दिलेली आहे अशा आहेत. एक-दोघे जण बेफिकीरपणे फिरतात. पोलिसांची भूमिका ही नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याची आहे.

**Lokmat 11.04.20**

# परराज्यात किंवा दुसऱ्या जिल्ह्यात अडकलेल्यांना परवानगी देणार

## पुणे पोलीस : कारण योग्य वाटल्यास निर्णय देणार

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोरोनाचा संसर्ग होऊ नये, यासाठी राज्यात लॉकडाऊन केला आहे. यामुळे संचारबंदी केली आहे. सार्वजनिक तसेच खासगी वाहतूक बंद केल्याने त्याचा फटका अनेक नागरिकांना बसला आहे. कामाच्या निमित्ताने बाहेरगावी गेलेल्या नागरिकांना लॉकडाऊनमुळे अडकून राहावे लागले आहे. कित्येकांना पुन्हा आपापल्या गावी परतायचे आहे; परंतु पोलिसांनी अटकाव केल्याने ते शक्य होत नसल्याचे दिसून आले. यावर पोलिसांनी आता जे नागरिक परराज्यांत अथवा दुसऱ्या शहरांत अडकले आहेत, त्यांना प्रवासासाठी परवानगी दिली जाईल. मात्र, त्यासाठी त्यांनी दिलेले कारण पोलिसांनी योग्य ठरविणे गरजेचे आहे.

पुणे पोलिसांनी आता अत्यावश्यक कारणामुळे परराज्यात प्रवास करता येईल, अशी माहिती दिली आहे. यासाठी संबंधित नागरिकांनी [illegible] या मेल आयडीवर विनंती अर्ज पाठविण्याची सूचना केली आहे. याशिवाय अधिक माहिती मिळविण्यासाठी ०२०-२२०२१६८० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. केंद्र सरकार तसेच राज्य सरकारकडून नागरिकांना ज्या ठिकाणी आहे, तिथे राहण्याचे आवाहन केले असताना काही नागरिकांनी अक्षरश: हजारो किलोमीटरचा पायी प्रवास केला आहे.

या लॉकडाऊनमुळे त्यांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागले आहे. आता पोलिसांनी मेल आयडी आणि दूरध्वनी क्रमांक दिल्याने त्यांना थोडा फार दिलासा मिळणार आहे. पुणे पोलिसांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून ज्यांना महाराष्ट्रातून प्रवास करायचा आहे, त्यांना योग्य कारण असल्यास परवानगी दिली जाणार असल्याचे स्पष्ट केले.

### अत्यावश्यक सेवेसाठी डिजिटल पास

सध्या अत्यावश्यक सेवेसाठी पुणे पोलिसांकडून शहरातील अंर्तगत प्रवासाकरिता डिजिटल पास वितरित करण्यात आले आहेत. हा पास मिळवून तो पोलिसांना दाखवल्यास शहरात प्रवास करता येणार असल्याचे पुणे पोलिसांनी सांगितले आहे.

**Mata 19.04.20**

# सर्दी, खोकल्याची औषधे नेणाऱ्यांची माहिती कळवा

## औषध दुकानदारांना पोलिसांच्या सूचना

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सर्दी, ताप, कोरडा खोकला आणि श्वसनविकारावरील औषधे घेण्यास येणाऱ्या ग्राहकांची माहिती नोंदवून ती दररोज पोलिसांना कळविणे शहरातील औषध विक्रेत्यांना बंधनकारक करण्यात आले आहे. पोलिस नियंत्रण कक्षाक डील ८९७५९५३१०० या क्रमांकावरील व्हॉट्सअॅपवर सर्व ग्राहकांचा दैनंदिन अहवाल दररोज सायंकाळी आठ वाजता पाठविण्यात यावा, असे आदेश पोलिस सहआयुक्त रवींद्र शिसवे यांनी दिले आहेत.

शहरात कोरोनाची बाधा झालेल्या व्यक्तींवर महापालिका, ससून रुग्णालय; तसेच काही खासगी रुग्णालयांमध्ये उपचार करण्यात येत आहे. करोनाबाधितांची दिवसेंदिवस संख्या वाढते आहे. त्यामुळे अशा बाधितांना वेळीच शोध घेऊन त्यांच्यावर उपचार करणे आवश्यक आहे. या बाधितांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींचाही शोध घेऊन त्यांना 'क्वारंटाइन' करणे गरजेचे आहे. त्यामुळे अशा बाधितांच्या शोधासाठी महापालिका वेगवेगळे प्रयत्न करीत असताना पोलिसांनीही त्यात उडी मारली आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील मेडिकलमध्ये सर्दी, ताप, कोरडा खोकला, श्वसनास त्रास या आजारांवरील औषधे घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांची माहिती पोलिसांकडून संकलित करण्यात येत आहे.

**'ही माहिती देणे बंधनकारक'**

पोलिस सहआयुक्त रवींद्र शिसवे यांनी भारतीय दंड संहिता विधान कलम १८८; तसेच साथरोग अधिनियम १८९७ या कायद्यान्वये ही माहिती न देणाऱ्या मेडिकल व्यावसायिकांवर कारवाई करण्यात येणार आहे. महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ च्या कलम ६८ अन्वये आदेश काढण्यात आले असून, ते सर्व मेडिकल व्यावसायिकांवर बंधनकारक करण्यात आले आहेत. करोनाविरोधातील लढाईत मेडिकल व्यावसायिकांचीही साथ आवश्यक असून, ती मिळावी, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त डॉ. संजय शिंदे यांनी केले आहे.

सर्दी, ताप, कोरडा खोकला, श्वसनास त्रास होणे आदी आजारांसाठी औषधांची मागणी करणाऱ्या रुग्णांना महापालिकेकडून सुरू करण्यात आलेल्या फ्लू क्लिनिकची माहिती दिली जावी.

### असे आहेत पोलिसांचे आदेश

- सर्दी, ताप, कोरडा खोकला, श्वसनविकारांच्या औषधांची मागणी करणाऱ्या ग्राहकाचे नाव, पत्ता, फोन नंबर नोंदवावा.
- डॉक्टरांच्या प्रीस्क्रिप्शनशिवाय औषधांची खरेदी करणाऱ्या ग्राहकांची नोंद प्राधान्याने करावी.
- औषधे कोणासाठी घेतली जात आहेत, याची चौकशी करून अशा रुग्णांची संपूर्ण माहिती घ्यावी.
- दररोज सायंकाळी आठ वाजता पोलिस नियंत्रण कक्षाच्या ८९७५९५३१०० या क्रमांकावरील व्हॉट्सअॅपवर ही माहिती द्यावी.
- ग्राहकांच्या दैनंदिन अहवालाची फोटोकॉपी न चुकता सादर करावी.
- ग्राहकांची माहिती देताना फार्मासिस्टचे नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक (लँडलाइन व मोबाइल नंबर) द्यावा.
- महापालिकेच्या ७२ फ्लू क्लिनिकची यादी दुकानाच्या दर्शनी भागात लावावी.

### मास्क न घालणे पडले महागात

पुणे : लॉकडाउनमध्ये लष्कर परिसरातील रस्त्यावर मास्क न घालता फिरणे काही जणांना चांगलेच महागात पडले आहे. या नागरिकांवर थेट गुन्हे दाखल केल्यानंतर सात जणांना लष्कर कोर्टाने प्रत्येकी एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

वाजिद नासिर शेख (३१, रा. लष्कर), अमन अमजद शेख (१९), महंमद तल्हा जमादार (३४, रा. भवानी पेठ), हेमंत गणेश चव्हाण (२२, रा. भवानी पेठ), अजिम अकबर शेख (३२, रा. नानापेठ), सिद्धार्थ मनोज गायकवाड (२१), अतीक अल्ताफ पटेल (३०, रा. लष्कर) अशी शिक्षा सुनावण्यात आलेल्यांची नावे आहेत.

Lokmat 24.04.20

# तुमच्या कर्तव्याची तुलना युद्धभूमीशीच

## डॉ. के. व्यंकटेशम : पत्राद्वारे अधिकारी, कर्मचाऱ्यांचा गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या सव्वा महिन्यापासून कोरोनाविरुद्धच्या या लढाईत रस्त्यावर उतरुन काम करणाऱ्या सर्व पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी एक भावनिक साद घालणारे पत्र लिहिले आहे. त्यात त्यांनी ज्या सेवाभावी वृत्तीने आपण आपले कर्तव्य बजावत आहात याची तुलना युद्धभूमीशीच करावी लागेल, अशा शब्दांत गौरव केला आहे.

इतर वेळी पोलिसांच्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या जनतेने कोरोनाविरुद्धच्या लढाईतील कामाचे तोंडभरून कौतुक केले आहे. आपल्या सहकाऱ्यांच्या या कामगिरीचा पोलीस आयुक्त डॉ. व्यंकटेशम यांनी खुले पत्र देऊन त्यांच्यातील आत्मविश्वासाला अधिक बळ दिले आहे.

सुरक्षा साधनांचा उपयोग करुन स्वत:ची व आपल्या समाजाची काळजी घेऊन तो रोगमुक्त, भयमुक्त कसा राहील यासाठी प्रयत्न करुयात, असे आवाहन त्यांनी सहकाऱ्यांना केले आहे.

दिवसाची रात्री अन् रात्रीचा दिवस करत पोलीस अधिकारी व कर्मचारी कोरोनाच्या संकटात रस्त्यावर उभे आहेत. दिवसेंदिवस शहरात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढतो आहे. पोलीस दलातील काही कर्मचाऱ्यांनादेखील कोरोनाची लागण झाली आहे. तरीदेखील कर्तव्यापुढे आपल्या जिवाची पर्वा न करता पोलीस खंबीरपणे लढा देत आहेत.

### पत्रात पोलीस आयुक्त म्हणतात

नमस्कार माझ्या प्रिय सहकाऱ्यांनो....

पोलीस दलाचा खरा कणा असलेले तुम्ही सर्व जण ज्या धीराने सध्या कर्तव्य बजावत आहात, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करायला शब्द कमी पडत आहेत. गेला सव्वा महिना कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी पोलीस म्हणून आपण कर्तव्य पार पाडत आहात. लॉकडाऊनची कडक अंमलबजावणी करताना नाक्या-नाक्यावर, चेकिंग पाईंटवर, वाड्या वस्त्यांमध्ये जाऊन उन्हातान्हाची तमा न बाळगता रात्रंदिवस ज्या कर्तव्यभावनेने आणि सेवाभावीवृत्तीने आपले कर्तव्य बजावत आहेत, त्याची तुलना युद्धभूमीशीच करावी लागेल.

आपण आपले कर्तव्य पार पाडत असताना, योग्य ती काळजी घ्यायला हवी. फिजिकल डिस्टन्सिंगचे सर्व नियम पाळायला हवेत. कर्तव्यावर वारंवार मास्क आणि सॅनिटायझरचा वापर करायला हवा. पुढील काही काळ आपण ही गोष्ट पोलीस दलातील शिस्तीप्रमाणेच न विसरता अंमलात आणायवयाची आहे, हे आपल्या सर्वांना नम्र आवाहन...

आपण सर्व जण एक कुटुंब आहोत. सध्याच्या कठीण काळात आपली संघभावना, सचोटी व सेवाभावी वृत्ती ही सर्व प्रकारच्या आव्हानांवर मात करण्यात यशस्वी होईल.

### खऱ्या अर्थाने समाजसेवा करायची वेळ...



◆ आपल्यापैकी बऱ्याच जणांना नोकरीला लागताना मुलाखतीच्या वेळी तुम्ही पोलीस दलात का सहभागी होणार आहात असा विचारलेला प्रश्न तुम्हाला आठवत असेल. त्याचे सरधोपट उत्तर मला समाजाची सेवा करायची आहे असे दिलेले आठवत असेल. त्याच उत्तराला आता जागण्याची वेळ आता आली आहे, असे आयुक्तांनी या पत्रात म्हटले आहे.

Lokmat 30.04.20

# नागरिकांच्या मदतीसाठी आता विशेष पोलीस अधिकारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**वानवडी :** कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी संचारबंदी करण्यात आली. फक्त अत्यावश्यक वस्तू घेण्यासाठी नागरिक अपुरा दिलेल्या वेळेत घराबाहेर पडत आहेत. मात्र घराबाहेर पडणाऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने वानवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्रांतिकुमार पाटील यांनी वानवडी पोलीस चौकीच्या माध्यमातून 'विशेष पोलीस अधिकारी' हा उपक्रम सुरू केला आहे.

वानवडी पोलीस ठाणे हद्दीतील भैरोबानाला, वानवडी बाजार, महंमदवाडी व घोरपडी पोलीस चौकी अंतर्गत येणाऱ्या गणेश मंडळातील कार्यकर्ते, सामाजिक कार्य करण्याची आवड असणारे तसेच पोलीसमित्र यांच्यातील सात्त्विक व्यक्तींची या उपक्रमासाठी निवड केली आहे. ज्यांना आरोपाचा कोणताही त्रास नाही व गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही, अशा जवळपास ५०० व्यक्तींची विशेष पोलीस अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. त्यासाठी मार्गदर्शक सूचना केल्या आहेत.

नागरिकांना काही वस्तू, औषधे, भाजीपाला, किराणा लागत आहे., अशा व्यक्तीने 'विशेष पोलीस अधिकारी' यांच्याकडे सांगावे. नियुक्त केलेली व्यक्ती सर्व वस्तू आणून देईल व घराबाहेर पडणाऱ्यांचे प्रमाण आटोक्यात येईल, असा या उपक्रमागील उद्देश आहे.

तसेच लोकांना विनाकारण बाहेर येऊ न देणे, सर्दी, खोकला, ताप असणाऱ्या व्यक्तींची माहिती कळविणे, जमाव करून उभे असल्यास पोलिसांना कळवावे, अवैध धंद्याविषयी माहिती कळविणे, सोशल मीडियावर विशेष काही असल्यास पोलिसांना लक्षात आणून देणे, आरोग्य विभागाचे काही काम असल्यास त्या संदर्भातील माहिती पोलिसांना कळविणे, काही चांगले कार्य घडत असेल तर ते पोलिसांच्या नजरेस आणून देणे अशा प्रकारची कार्य व सूचना नियुक्त करून दिलेल्या विशेष पोलीस अधिकारी व्यक्तींना देण्यात आल्याचे वानवडी वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्रांतिकुमार पाटील व गुन्हे विभागाचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी सांगितले.

वानवडी पोलिसांच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या यांसह विविध उपक्रमासाठी पोलीस उपनिरीक्षक तेलंग व गणेश छगत तसेच सर्व चौकीतील पोलीस अधिकारी, कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

### कोविड-१९ फायटरसाठी विशेष नियम



1 'कोविड-१९ फायटर' म्हणून असे संबोधले जाणाऱ्या विशेष पोलीस अधिकाऱ्यांना वानवडी पोलिसांच्या वतीने संचारबंदी काळापुरते टी-शर्ट व 'विशेष पोलीस अधिकारी'चे ओळखपत्र दिले आहे. विशेष पोलीस अधिकारी यांची नेमणूक ही संचारबंदी काळापुरती मर्यादित आहे.

2 दिलेल्या भागाव्यतिरिक्त कोठेही न जाणे, नागरिकांना शिवीगाळ न करणे, नियुक्त कार्डधारकांनी जवळ काठी, हत्यार बाळगू नये तसेच कोणी हुज्जत, वादविवाद करत असल्यास सरळ पोलिसांना कळवावे, असे नियम नियुक्त केलेल्या विशेष पोलीस अधिकारी व्यक्तींना घालण्यात आले आहेत.

**Mata 04.04.20**

# पोलिसांचा मोर्चा सोसायट्यांकडे

## सभासद विनाकारण घराबाहेर पडल्यास पदाधिकाऱ्यांना नोटिसा धाडणार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

करोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव पाहता संपूर्ण देशात लॉकडाउन जाहीर केले आहे. त्यानंतरही काही नागरिक घराबाहेर पडत असल्याचे लक्षात आल्याने आता पोलिसांनी शहरातील मोठ्या सोसायट्यांकडे आपले लक्ष केंद्रित केले आहे. सोसायटीने अध्यक्ष तसेच सचिवांना नोटिसा बजावून रहिवासी बाहेर पडणार नाहीत, याची काळजी घ्यावी, अन्यथा तुमच्यावर कारवाई होऊ शकते, असा इशारा नोटिशीत देण्यात आला आहे. शहरातील काही हजार सोसायट्यांना ही नोटीस देण्यात आली आहे.

शहरातील सर्वच भागातील बहुतांश मोठ्या सोसायट्यांना अशा नोटिसा देण्यात आलेल्या आहेत. संबंधित भागातील स्थानिक पोलिस स्टेशनच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकांमार्फत या नोटिसा देण्यात आल्या असून, सोसायटीमधील कोणताही सभासद विनाकारण बाहेर पडणार नाही, याची काळजी घेण्याची जबाबदारी आता संबंधित सोसायटीमध्ये पदाधिकारी म्हणून काम करणाऱ्यांवर टाकण्यात आली आहे.

सोसायटीमधील कोणी सभासद बाहेरगावी जाण्यासाठी घराबाहेर पडल्यास त्याची माहिती तातडीने पोलिस स्टेशनला देण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. करोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे. जीवनावश्यक वस्तूंची विक्री करणारी दुकाने वगळता इतर सर्वच दुकाने बंद करण्यात आली आहेत. शहरातील सुमारे ६० ते ६५ टक्के नागरिक सोसायट्यांमध्ये राहतात. संचारबंदीच्या काळात सर्वत्र बंद असल्याने काही सोसायट्यांमध्ये भाजीविक्री करणारा टेम्पो आल्यास खरेदी करण्यासाठी महिलांची गर्दी उसळते. हे करताना आवश्यक असलेली काळजी घेतली जात नाही. या पार्श्वभूमीवर आवश्यक खबरदारी घेण्याची जबाबदारी सोसायटीमध्ये काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर टाकण्यात आली आहे.

सोसायटीच्या आवारात येणारे भाजीपाला विक्रेते, दूध तसेच किराणा माल वितरकांबरोबर समन्वय साधावा. एकाच वेळी सर्वांना सोसायटीत न बोलवता त्यांच्या वेळा ठरवून घ्याव्यात. वस्तूंची खरेदी करताना पुरेसे अंतर (सोशल डिस्टन्सिंग) पाळावे. सोसायटीत येणाऱ्या नागरिकांना सॅनिटायझरचा वापर करण्यास सांगण्यात यावे. सोसायटीतून बाहेर पडणारे तसेच येणाऱ्या प्रत्येकाची नोंद करावी. महत्त्वाच्या कामाशिवाय रहिवाशांनी घराबाहेर पडू नये, असे आवाहन त्यांना करावे असे पोलिसांनी दिलेल्या नोटिशीमध्ये म्हटले आहे.

सोसायटीतील एखादी व्यक्ती बाहेरील देशातून किंवा परराज्यातून आली असल्यास आणि ती आपली ओळख लपवून ठेवत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्याची माहिती तातडीने पोलिसांना द्यावी. 'करोना'ची चुकीची आणि दिशाभूल करणारी माहिती समाजमाध्यमावर प्रसारित करू नये. नोटिशीमध्ये बजाविलेल्या सूचनांची अंमलबजावणी न केल्यास संबंधितांवर 'कलम १८८' नुसार कारवाई केली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. कोथरूड, कर्वेनगर, सिंहगड रस्ता, हडपसर, सहकारनगर, कात्रज, सुखसागरनगर, औंध, वारजे, वडगावशेरी आदी भागातील सोसायट्यांना ही नोटीस बजावण्यात आली आहे.




### हडपसरमध्ये ३८० नोटिसा

हडपसर भागातील ३८० सोसायट्यांना हडपसर पोलिसांनी नोटीस दिली आहे. हडपसर परिसरातील बऱ्याच सोसायट्यांमधील रहिवासी परदेशातून आले आहेत. त्यांना महापालिकेने होम क्वारंटाइनच्या सूचना दिल्या आहेत. मात्र, याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी पोलिसां त केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी ३८० सोसायट्यांना 'कलम १४४'च्या नोटिसा पाठवून नियमांची आठवण करून दिली आहे, अशी माहिती हडपसर पोलिस ठाण्याचे गोपनीय विभागाचे पोलिस नाईक तानाजी देशमुख यांनी दिली.

### ...ही काळजी घ्यावी

- नागरिकांनी सकाळी आणि सायंकाळी बाहेर फिरायला जाणे टाळावे.
- पाळीव प्राण्यांना शक्यतो बाहेर नेऊ नये.
- सोसायटीतील एखादा रहिवासी आजारी पडल्यास किंवा त्याला 'करोना'सारखी लक्षणे वाटल्यास तातडीने १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिका सेवेबरोबर संपर्क साधावा.
- विलगीकरण करण्यात आलेला रहिवासी बाहेर पडताना आढळल्यास त्याची माहिती पोलिसांना द्यावी.
- भाजी तसेच जीवनावश्यक साहित्याची खरेदी करण्यासाठी गर्दी करू नये.

**Mata 20.04.20**



# सायबर चोरट्यांकडून मिळवले ₹५७ लाख

म. टा. प्रतिनिधी, पुणे

लॉकडाउनच्या काळात सायबर चोरट्यांनी विविध माध्यमांतून १४१ नागरिकांची फसवणूक करून, ऑनलाइन स्वरूपात पळविलेले ५७ लाख ७७ हजार रुपये परत मिळविण्यात सायबर पोलिसांना यश आले आहे. विशेष म्हणजे लॉकडाउनमध्ये पैसे लंपास झाल्याच्या तक्रारी नागरिकांनी सायबर पोलिसांकडे ऑनलाइन केल्या. त्याची तत्काळ दखल घेऊन पोलिसांनी ही रक्कम नागरिकांना परत मिळवून दिली आहे.

करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशात लॉकडाउन आहे. या काळातही सायबर चोरटे वेगवेगळ्या कारणांसाठी नागरिकांकडून पैसे उकळत असल्याचे समोर आले आहे. पुण्यात १९ मार्चपासून सायबर चोरट्यांनी ऑनलाइन पैसे उकळलेल्या १४१ नागरिकांचे ५७ लाख ७७ हजार रुपये सायबर पोलिसांनी परत मिळवून दिले आहेत. यामध्ये प्रामुख्याने ओटीपी शेअर, डेबिट-क्रेडिट कार्ड फ्रॉड, लिंक पाठवून केलेली फसवणूक यांचा समावेश आहे. या नागरिकांनी सायबर चोरट्यांकडून फसवणूक झाल्याची ऑनलाइन तक्रार केल्यानंतर तत्काळ बँकांशी संपर्क साधून ते पैसे थांबविण्यात आले. ती रक्कम या नागरिकांना परत करण्यात आली.

'लॉकडाउनमध्ये नागरिक घरी आहेत. नागरिकांची ऑनलाइन फसवणूक होऊ नये म्हणून काळजी घ्यावी. अशी फसवणूक झाल्यास तत्काळ सायबर सेलकडे संपर्क साधावा,' असे आवाहन सायबर सेलचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांनी केले.

शहरात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. सध्या गंभीर गुन्ह्यांपेक्षा सायबर गुन्ह्यांची संख्या पुण्यात जास्त आहे. महिन्याला आठशे ते नऊशे सायबर गुन्हे शहरात घडत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने डेबिट-क्रेडिट कार्ड फ्रॉड, ओटीपी मिळवून फसवणूक, ऑनलाइन खरेदी, ओएलएक्स फ्रॉड, मॅट्रिमोनी फ्रॉड, जॉब फ्रॉड असे गुन्हे जास्त आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये नागरिकांना पेटीएम अपडेट करण्यास सांगून ऑनलाइन फसवणूक केली जात आहे.

### आरोपींची माहिती मिळाली

'लॉकडाउनच्या काळात काही नागरिकांचे व्हॉट्सअॅप हॅक होण्याच्या घटना समोर आल्या होत्या. या प्रकरणी सायबर सेलकडे तक्रार आल्यानंतर व्हॉट्सअॅपच्या सुरक्षेबाबत कंपनीला कळविण्यात आले होते; तसेच नागरिकांना अॅपच्या सेटिंगमध्ये जाऊन 'टू स्टेप व्हेरिफिकेशन' सुरू करण्यास सांगण्यात आले होते. त्यामुळे यासंदर्भातील तक्रारी कमी झाल्या आहेत. नागरिकांचे व्हॉट्सअॅप हॅक करणाऱ्या आरोपींची माहिती मिळाली आहे,' अशी माहिती पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांनी दिली.

**Lokmat 08.05.20**

# पूर्ववैमनस्यातून तरुणावर कोयत्याने वार

## कात्रजच्या खोपडेनगरमधील घटना : ६ जणांवर गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** पूर्वीच्या भांडणाचा राग मनात धरून एका तरुणाच्या डोक्यात व पाठीवर कोयत्याने वार करून त्याला जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

याप्रकरणी शुभम राजेंद्र कोंढाळकर (वय २२, रा. खोपडे हाईट्स, खोपडेनगर, कात्रज) यांनी भारती विद्यापीठ पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. पोलिसांनी प्रेम कांबळे, चिराग, सुनील पवार, आकाश नंदुरे, महादेव नंदुरे, महेश चव्हाण या ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार कात्रज येथील खोपडेनगरमधील माताजी सुपर मार्केट येथे ५ मे रोजी रात्री साडेआठ वाजता घडला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार : शुभम कोंढाळकर आणि आरोपी यांची ५ मे रोजी दुपारी किरकोळ अपघातावरून भांडणे झाली होती. त्या वेळी आरोपींनी शुभम याला पाहून घेण्याची धमकी दिली होती. त्याचाच राग मनात धरून पाच ते सहा जणांनी रात्री साडेआठच्या सुमारास तरुणाच्या घरी जाऊन त्याला एकटे गाठून दहशत निर्माण करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी आरोपींपैकी सुनील पवार, महेश चव्हाण या दोघांनी त्यांच्याकडील कोयत्याने तरुणाच्या डोक्यात व पाठीत वार केले. त्यामध्ये शुभम गंभीर जखमी झाले. त्यानंतर आरोपी तेथून पळून गेले. शुभम याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर त्यांनी पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. सध्या कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी जमावबंदी व संचारबंदी लागू करण्यात आली आहे. असे असतानाही आरोपींनी आदेशाचे पालन न करता, तोंडाला मास्क न लावता कोरोनाचा संसर्ग फैलावण्यास कारणीभूत होऊन तरुणाला मारहाण केली.



**गणवेशाच्या आतही असतो माणुसकीचा झरा :** पुणे : अलंकार पोलीस ठाणे आणि स्वयंसेवी संस्था, वर्तिका गुप्ता तसेच समाजसेवक रवींद्र रोडे यांच्या सहकार्याने गरजवंतांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले. यावेळी एकूण शंभर फूड पॅकेट आणि ६५ अन्नधान्याचे वाटप करण्यात आले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक कल्पना जाधव यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

**Lokmat 11.05.20**

## परराज्यातील मजुरांच्या यादीचे काम घेतले हाती : सुरुवात खडक पोलीस स्टेशनपासून

# पोलीसमामांच्या मदतीसाठी सरसावली 'यंग ब्रिगेड'

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** दिवसरात्र काम करून, बंदोबस्तासाठी सात ते आठ तास उभे राहून कोरोनाला हटविण्यासाठी पुणे पोलीस शर्थीचे प्रयत्न करत आहेत. त्या कामाचा ताण वाढतो आहे. तुलनेने अपुरे मनुष्यबळ आहे. त्यात काम करण्याची सक्ती अशातच नव्याने कामाची जबाबदारी वाढते आहे. परराज्यातील मजुरांची नावे, त्यांचे रेकॉर्ड तयार करताना पोलिसांची दमछाक होत असल्याने त्यांच्या दिमतीला 'यंग ब्रिगेड' धावून आली. या कामाची सुरुवात खडक पोलीस स्टेशनपासून केली आहे.

कोरोनाचा वाढणारा प्रादुर्भाव यामुळे परराज्यातील मजूर, कामगारांना त्यांच्या गावी पाठविण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यानुसार त्या मजुरांची यादी तयार करण्याचे काम सुरु केले आहे. मात्र सध्या शहरातील निम्म्याहून अधिक पोलीस दल हे बंदोबस्ताच्या कामात व्यस्त असताना उपलब्ध मनुष्यबळात नावनोंदणीचे काम करणे जिकिरीचे होत असल्याचे दिसून आले आहे. यासाठी भोई फाउंडेशनच्या वतीने पुढाकार घेऊन त्या पोलिसांना मदत करण्यासाठी अनेक युवक-युवती सरसावले आहेत. 'आपल्याकरिता जीवावर उदार होऊन काम करणाऱ्या पोलिसांसाठी काही करण्याच्या इच्छेतून' बरेच जण यात सहभागी झाले आहेत. खडक पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक उत्तम चक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली १६ तरुण स्वयंसेवक चार ते पाच तासांच्या वेळेत काम करत आहेत. मुंढवा पोलीस स्टेशनमध्येही तरुण पोलिसांना मदत करत आहेत.

यावियषी पुणे पोलीस विघ्नहर्ता न्यासचे विश्वस्त डॉ. मिलिंद भोई म्हणाले, पोलीस कर्मचाऱ्यांवर असणारा ताण आणि त्यांची संख्या लक्षात घेता या कामांसाठी मदत हवी असल्याचे पुणे पोलिसांकडून सांगण्यात आले.

त्यानुसार व्हॉट्सअॅप ग्रुप आणि फेसबुकच्या माध्यमातून नागरिकांना आवाहन करण्यात आले. यात अनेकांनी उस्फूर्तपणे आपला सहभाग नोंदवला आहे.

मदत करणाऱ्यांमध्ये आयटी कर्मचारी, विद्यार्थी, व्यावसायिक, नोकरदार सर्व स्तरांतील व्यक्तींचा समावेश आहे. शहरात एकूण ४० पोलीस स्टेशन असून, त्या भागातील कामगार, मजूर यांची पूर्ण माहिती एकत्र करून त्याचा 'डेटाबेस' तयार करण्याचे काम सुरु आहे. शहरातील इतर भागांमध्ये देखील खासकरून वारजे माळवाडी, सिंहगड यांसारख्या पोलीस स्टेशनमध्ये देखील स्वयंस्फूर्तीने काम करणाऱ्यांची गरज आहे.

◆ सामाजिक बांधिलकी आणि सहकार्य या भावनेतून कॉम्प्युटरवर माहिती भरण्याचे काम करत आहे. मागील दीड महिन्यापेक्षा अधिक काळ बंदोबस्तात कार्यरत असणाऱ्या पोलिसांसाठी थोडीशी मदत असेल. सध्या सुटी आहे, घरात रिकामा बसून राहण्यापेक्षा आपल्यामुळे कुणाला मदत होणार असल्यास त्यासाठी आवर्जून पुढाकार घ्यायला हवा, असे मुंढवा पोलीस स्टेशन येथे काम करणारे सामाजिक बांधिलकी अधिकारी हरेंद्र गोडांबे आणि मॅकेनिकल इंजिनिअर धर्मेंद्र चौहान यांनी सांगितले.



पोलिसांसोबत मजुरांची यादी करताना यंग ब्रिगेड.

**Lokmat 03.05.20**



**पोलिसांना मास्क वाटप :** जनसेवा उत्कर्ष स्वयंसहायता बचत संघाचे अध्यक्ष सुरेश अण्णा गुजर यांच्यावतीने उपनगरात पोलीस कर्मचारी आणि सफाई कामगार यांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पंधारकर यांच्या हस्ते एन-९५ मास्क आणि सॅनिटायझरचे वाटप केले.

Lokmat 26.05.20

# तडीपार गुन्हेगारांवर फेस रीडिंग ॲपद्वारे पोलिसांची नजर

## पोलिसांवरील ताण होणार कमी : संपर्काचा धोका टळणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातून तडीपार केल्यानंतरही शहरात येऊन गुन्हे करणाऱ्या तडीपार गुन्हेगारांवर लक्ष ठेवण्यासाठी प्रत्यक्ष नजर ठेवावी लागत होती. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे गुन्हेगाराच्या घरी जाऊन चेकिंग करणे अवघड होऊ लागल्याने आता शहर पोलीस अशा सराईत गुन्हेगारांवर फेस रीडिंग ॲपद्वारे नजर ठेवणार आहे. त्यामुळे पोलिसांवरील ताण कमी होणार आहे. तसेच, कोरोनाची लागण होण्याचा धोका कमी झाला आहे. होम क्वारंटाइन करण्यात आलेल्या व्यक्तीवर पाळत ठेवण्यासाठी हे ॲप तयार करण्यात आले आहे. त्यात काही तांत्रिक बदल करून, आता त्याचा उपयोग गुन्हेगारांवर नजर ठेवण्यासाठी केला जाणार आहे.

तडीपार गुन्हेगारांना दररोज किंवा पोलीस सांगतील तेव्हा तेव्हा त्यांच्या चेहऱ्याचा फोटो त्याच्याकडील मोबाईलवरुन ॲपमध्ये अपलोड करावा लागेल. त्याने फोटो अपलोड केल्यानंतर जीपीएसद्वारे पोलिसांना त्याचे लोकेशन कळेल. तसेच, फोटो अपलोड केल्यानंतर तो शहरात आला तर त्याची माहिती तत्काळ पोलिसांना समजेल. त्यामुळे त्याला पकडणे सोपे जाणार आहे. कोरोना संसर्ग झालेल्यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींना खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाकडून होम क्वारंटाइन करण्यात येत होते. मात्र, होम क्वारंटाइन केलेल्या व्यक्ती नियमांचे उल्लंघन करून बाहेर पडत असल्याचे दिसून आले होते. त्या पार्श्वभूमीवर त्यांच्यावर पाळत ठेवण्यासाठी पोलिसांनी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करुन एच.क्यू.टी.एस. (होम क्वारंटाईन ट्रॅकिंग सिस्टीम) हे ॲप तयार केले. त्यामध्ये फेस रीडिंग व जीपीएस सुविधेची मदत घेण्यात आली होती. क्वारंटाइन केलेल्या व्यक्तीस त्याच्या मोबाईलमध्ये हे ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. त्या व्यक्तीने दररोज ठरवून दिलेल्या जागेवर जाऊन फोटो काढून तो अपलोड करायला सांगितला जात होता. त्यामुळे पोलिसांना जीपीएसच्या मदतीने ती व्यक्ती घरात आहे की नाही, हे समजत होते. त्यामुळे क्वारंटाइन व्यक्तींवर लक्ष ठेवण्यासाठी पोलिसांना खूपच मदत झाली होती. या ॲपचा आता तडीपार गुंडावर लक्ष ठेवण्यासाठी वापर करण्याचे पोलिसांनी ठरविले आहे.

शहर पोलीस दलाकडून सराईत गुन्हेगारांना एक ते दोन वर्षे तडीपार केले जाते. त्यांना दुसऱ्या जिल्ह्यात सोडले जाते. मात्र, अनेक गुंड तडीपारीचा भंग करून शहरात येऊन गुन्हे करत असतात. त्यांच्यावर लक्ष ठेवण्याचे काम पोलिसांना त्यांच्या घरी जाऊन करावे लागते. हे काम आता सोपे होणार आहे. तडीपार केलेल्या व्यक्तींच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर गदा येणार नाही, याची देखील काळजी घेतली आहे. या ॲपचे कामकाज अंतिम टप्प्यात असून, पुढील काही दिवसांत ते कार्यान्वित होईल. गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार हे ॲप सुरु करण्यासाठी काम करताहेत.

Prabhat 21.05.20

# पोलिसांना एका कॉलवर मोफत रुग्णवाहिका

**पुणे, दि. ३० -** करोनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी तत्काळ रुग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध होणार आहे. यासाठी मोटार परिवहन विभाग शिवाजीनगर येथे दोन रुग्णवाहिका २४ तास उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ही रुग्णवाहिका सेवा पूर्णपणे मोफत असणार आहे. ०२०-२६२०८२५० क्रमांकावर संपर्क केल्यानंतर रुग्णवाहिका उपलब्ध होणार आहे.

Lokmat 18.05.20

# शहरात अडकलेले ७०० विद्यार्थी गावी रवाना

## पोलिसांकडून विशेष प्रयत्न



लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** शिक्षण तसेच स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आलेले अनेक विद्यार्थी शहरात अडकून पडले होते. अशा विद्यार्थ्यांना गावी पाठविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले असून ३० गाड्यांमधून विद्यार्थी नुकतेच गावी रवाना झाले.

शहरात गेल्या दीड महिन्यांपासून अडकून पडलेल्या विद्यार्थ्यांची व्यथा पोलिसांकडे महेश बडे यांनी मांडली होती. काही विद्यार्थी गावी परतू शकत नव्हते. ते वसतिगृहात वास्तव्यास आहेत. त्यांना गावी जायचे आहे. मात्र, त्यांना घरी कसे परतायचे, याची माहिती उपलब्ध होत नसल्याने पोलिसांनी विद्यार्थ्यांना गावी पाठविण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी विनंती करण्यात आली होती. पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम, सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह, सहायक आयुक्त विजय चौधरी, पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते यांनी प्रयत्न केले.

नांदेड, लातूर, बीड, चंद्रपूर, बुलढाणा, अकोला, उस्मानाबाद, नागपूर, सातारा, अहमदनगर येथील ७०० विद्यार्थ्यांना नुकतेच ३० बसगाड्यांमधून आपआपल्या गावी रवाना करण्यात आले. गावी पाठविण्यापूर्वी त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. विद्यार्थ्यांना माफक दरात बससेवा उपलब्ध करून देण्यात आली. त्यांना मुखपट्टी, जंतुनाशके तसेच खाद्यपदार्थांची पाकिटे पुरविण्यात आली.

### भावी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण

स्पर्धा परीक्षा तयारीसाठी आलेले विद्यार्थी भावी काळात अधिकारी होणार आहेत. आपत्कालीन परिस्थितीत काम कसे करावे, याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना मिळाले असून गावी परतणाऱ्या विद्यार्थ्यांना पोलिसांनी शुभेच्छा दिल्या.

# स्पर्धा परीक्षांचे विद्यार्थी गडचिरोलीकडे

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणारे २४ विद्यार्थी पोलीस प्रशासनाच्या सहकार्यामुळे गडचिरोली येथील आपल्या घरी जाण्यासाठी पुण्याहून रवाना झाले. रविवारी सायंकाळी ते आपल्या गावी सुखरूप पोहोचले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचा अभ्यास करणारे हे २४ विद्यार्थी शहराच्या विविध उपनगरांमध्ये वास्तव्यास होते. त्यामध्ये ११ विद्यार्थिनी आणि १३ विद्यार्थ्यांचा समावेश होता. टाळेबंदीमध्ये घरी जाण्यासाठी प्रयत्नांचा भाग म्हणून त्यांनी पुणे महापालिकेच्या बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता रामचंद्र शिंदे आणि युवा सेनेच्या मनीषा धारणे यांच्याशी संपर्क साधला. धारणे यांनी अप्पर पोलीस आयुक्त अशोक मोराळे यांच्याशी संपर्क साधून या विद्यार्थ्यांना घरी जाण्याची परवानगी मिळवून दिली.

पोलीस उपायुक्त शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त सर्जेराव बाबर आणि स्वारगेट पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ब्रह्मानंद नाईकवडे यांच्या उपस्थितीत वैद्यकीय तपासणी करून त्यांना गडचिरोलीला रवाना करण्यात आले. स्वारगेट पोलीस ठाण्याच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या विद्यार्थ्यांना भोजन दिले.

## Prabhat 26.05.20

# 'अपने दरवाजे पर रमजान के पहलेही फरिश्ता आया है...'

**ईदनिमित्त दत्तवाडी पोलिसांचे 'सोशल पोलिसिंग'**



प्रभात वृत्तसेवा


पुणे, दि. २५ - करोनामुळे तरुण मुलाचा मृत्यू झाल्याने पर्वती टेकडी येथील एक कुटुंब हादरले आहे. हे समजताच या कुटुंबाला ईदचा आनंद द्यावा, यासाठी दत्तवाडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांनी रमजान ईदच्या पूर्वसंध्येला या कुटुंबाच्या घरी शिरखुर्मासाठी लागणारे साहित्य नेले. ते पाहून त्या वयोवृद्ध वडिलांना गहिवरून आले. त्यांनी 'अरे बेगम बाहर आओ, अपने दरवाजे पर रमजान के पहिलेही फरिश्ता आया है,' अशा शब्दांत पोलिसांचे स्वागत केले. यावेळी उपस्थितांना अश्रू अनावर झाले.

जगभरात करोनाने अनेक निष्पाप नागरिकांना आपल्या कवेत घेतले आहे. त्यात पर्वती येथील एक युवक मुलगाही सापडला. उपचारांदरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेने या युवकाच्या कुटुंबीयांना जबर धक्का बसला आहे. ईद तोंडावर असतानाही हे घर सुनेसुने होते. ही घटना दत्तवाडी पोलिसांना समजली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांनी या कुटुंबाला शिरखुर्माचे साहित्य देण्याचा निर्णय घेतला.

पोलीस या घरी पोहोचले. त्यांनी हे साहित्य या कुटुंबाला दिले. त्यावर संबंधित युवकाच्या पित्याने पोलिसांना 'सरजी आपने ईद का तोहफा देकर इन्सानियत की मिसाल दी है,' असे म्हणत 'शुक्रिया' अदा केले.

(पान २ पहा) ▸▸

"



मुलाच्या निधनाने हे वृद्ध दाम्पत्य दुःखी आहे, हे समजल्यावर माझे मन हेलावून गेले. त्यांना दिलासा देण्यासाठी आणि ईद साजरी करण्यास त्यांना राजी करावे, असे वाटल्याने मी त्यांची भेट घेतली व त्यांचे दुःख थोडे हलके करण्याचा मानवतेच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केला.

– देविदास घेवारे,
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दत्तवाडी

## Loksatta 20.05.20



## Lokmat 16.05.02

### जनजागृतीसाठी पथसंचलन...



शीघ्र कृती दलाच्या (रॅपिड ॲक्शन फोर्स) जवानांनी शहरातील धनकवडी आणि सहकारनगर भागात शुक्रवारी कोरेना जनजागृतीसाठी पथसंचलन केले.

## Pudhari 11.05.20



स्वारगेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नागरिकांना सॅनिटायझर आणि मास्कचे वाटप करण्यात आले.

### पोलिसांकडून सॅनिटायझर, मास्कचे वाटप

पुणे : स्वारगेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील प्रतिबंधित क्षेत्रात स्वारगेट पोलिसांनी सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने तब्बल १२ हजार सॅनिटायझर, व १४ हजार कॉटन मास्कचे वाटप केले आहे. डायस प्लॉट, इंदिरानगर खड्डा, गुलटेकडीतील मीनाताई ठाकरे वसाहत या परिसरातील नागरिकांना हे साहित्य महावीर प्रतिष्ठानच्या सभागृहामध्ये आयोजित कार्यक्रमात वाटप करण्यात आले. यावेळी अपर पोलिस आयुक्त संजय शिंदे, उपायुक्त शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त सर्जेराव बाबर, महापालिका बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त सोमनाथ बनकर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक ब्रम्हानंद नाईकवाडी, पोलिस निरीक्षक शब्बीर सय्यद उपस्थित होते.

## Prabhat 13.05.20

# कॅन्टोन्मेंट भागात पोलिसांची गस्त वाढवली

पुणे, दि. १२ - कॅन्टोन्मेंट परिसरात अपार्टमेंटपासून वस्त्यांपर्यंत सर्व ठिकाणी करोनाबाधित आढळून येत असून, परिसरातील स्थिती गंभीर होत आहे. त्यामुळे या परिस्थितीचा सामना करण्यासाठी आता पोलिसांची कठोर पेट्रोलिंग आणि दंडात्मक कारवाईचा मार्ग बोर्डातर्फे अवलंबण्यात आला आहे.

लष्कर परिसरातील मोदीखाना, भीमपुरा, घोरपडी गाव, सोलापूर बाजार, फातिमानगर, भीमपुरा, साचापीर स्ट्रीट, दस्तूर मेहेर रस्ता या आठ भागांत करोनाबाधित रुग्ण आढळून आल्याने तेथील तीन किलोमीटरच्या परिघात प्रतिबंधित क्षेत्र घोषित केले आहे. या प्रतिबंधित क्षेत्राबाहेर करोनाचा प्रादुर्भाव वाढू नये, यासाठी बोर्डातर्फे प्रतिबंधित क्षेत्राची विभागणी केली आहे. परिसरातील आठ प्रतिबंधित क्षेत्रांची (कंटेन्मेंट झोन) सहा विभागात (सेक्टर) विभागणी, प्रत्येक विभागातील सत्तर ते शंभर घरांच्या ब्लॉकमागे दोन सुरक्षारक्षक, दोन स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक, प्रतिबंधित क्षेत्रातील नागरिकांना घरापाशी भाजीपाला, शिधा आदी वस्तू उपलब्ध करून देण्यासाठी स्वयंसेवकांच्या नियुक्त्या, बोर्ड, लष्कर पोलीस ठाणे आणि स्थानिक लष्करी प्रशासनाचे पेट्रोलिंग अन् सुरक्षित वावराचे निकष न पाळणाऱ्या व्यक्ती, दुकानांवर दंडात्मक कारवाई, अशा नियोजनाच्या जोरावर पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाने लष्कर परिसरातील करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कंबर कसली आहे. या विभागात सध्या आठ स्वयंसेवक नेमले असून, आणखी २४ स्वयंसेवकांना विशेष पास देण्यात येणार आहे. त्यासोबतच चाळीस सुरक्षारक्षक आणि सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. त्यांच्यावर सुरक्षित वावर आणि स्वच्छता राखण्याची जबाबदारी देण्यात आली आहे, अशी माहिती बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित कुमार यांनी दिली.

**Pudhari 03.05.20**

पुणे : पुढारी वृत्तसेवा
डॉ. नेहा कुशवा आणि आयटी अभियंता आदित्य सिंग बिस्ट या दोघांचा विवाह ठरला. फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात साखरपुडाही झाला. दोन मे रोजी डेहराडूनला ठरल्याप्रमाणे लग्न होणार होते. मात्र मार्च महिन्यात कोरोना संकट आले अन् लॉकडाऊन सुरू झाले. त्यामुळे अनेकांना सर्व नियोजित कार्यक्रम रद्द करावे लागले.

# कायदा रक्षकांनी दिला शुभ जीवनाचा मंत्र!

## अनोख्या विवाह सोहळ्यात पोलिसांनी पार पाडली वधू-वर पक्षांची जबाबदारी

पुणे पोलिसांनी सामाजिक बांधिलकी जपत डॉ. नेहा, आदित्यचा विवाह सोहळा घडवून आणला. लॉकडाऊनमुळे कर्तव्यावर हजर असल्यामुळे दोघांच्याही घरचे कोणीही नातेवाईक या लग्न सोहळ्याला उपस्थित राहू शकले नाहीत. मात्र पोलिसांनी ती उणीव दूर करत, वऱ्हाडी मंडळीपासून वधू-वर पक्षांची सारी जबाबदारी पार पाडली व थोडक्या पोलिसांच्या उपस्थितीत, सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळत हडपसरमध्ये हा विवाह सोहळा पार पडला.



विवाहबद्ध झालेले जोडपे. बाजूला पोलिस अधिकारी.

डेहराडून येथे लष्करात कार्यरत असलेले कर्नल देवेंद्रसिंग बिस्ट यांचा मुलगा आदित्य आणि नागपूर येथील लष्कर मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय सेवेत उच्चपदावर कार्यरत असणारे कर्नल डॉ. अरविंदसिंग कुशवा यांची मुलगी डॉ. स्नेहा कुशवा यांचा साखरपुडा फेब्रुवारीत झाला होता. आणि लग्नाचा मुहूर्त २ मे काढण्यात आला होता. मात्र लॉकडाऊनमुळे लग्नाला अडथळे येत होते. केवळ वधू, वर पुण्यात होते. दरम्यान कर्नल देवेंद्रसिंग यांनी हडपसर पोलिस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक प्रसाद लोणारे यांच्याशी संपर्क केला. त्यानुसार पोलिस उपायुक्त सुहास बावचे यांनी पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांच्या मार्गदर्शनानुसार हा विवाह सोहळा घडवून आणला. पोलिसांनीच या लग्नसमारंभात कन्यादान केले, तसेच नातेवाईकांच्या भूमिकेत पोलिस अधिकारी आणि कर्मचारी या लग्नसमारंभात उपस्थित होते.

सर्व नाती जपत तसेच सोशल डिस्टन्सचे नियम तंतोतंत पाळत आज साधेपणाने हा विवाह पार पडला.

> दोन्ही परिवाराकडील नातेवाईक लष्करात सेवेची परंपरा असणारे आहेत. सध्या कोरोनाच्या संकटात ते त्यांचे कर्तव्य पार पाडत आहेत. तसेच लॉकडाऊन असल्यामुळे काही अडचणी देखील निर्माण झाल्या होत्या. मात्र त्यांनी पुणे पोलिसांशी संपर्क करून लग्नाच्या तारखेबाबत सांगितले. त्यांनी दिलेल्या परवानगीनुसार पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांच्या मार्गदर्शनाखाली हडपसर पोलिसांनी हा विवाह सोहळा घडवून आणला.
> -**सुहास बावचे**, पोलिस उपायुक्त, परिमंडळ पाच

> २ मे रोजी आमचा विवाह डेहराडून येथे होणार होता. कोरोनाच्या संकटामुळे देशव्यापी लॉकडाऊनला सुरुवात झाली. त्यामुळे आम्ही पुण्यात अडकलो. वडील लष्करात कर्नल पदावर असून, ते त्यांचे वैद्यकीय कर्तव्य निभावत आहेत. माझे सासरे देखील कर्तव्यावर आहेत. त्यामुळे त्यांना हजर राहता आले नाही. मात्र पुणे पोलिसांनी आमचा विवाह सोहळा संपन्न करून दिला. आम्ही खूप आनंदी आहोत.
> - **डॉ. नेहा कुशवा** (वधू)

**Punyanagari 26.05.20**

# प्लॅनिंगअभावी स्थलांतरित श्रमिकांची वाताहत : मेधा पाटकर

पुणे : प्रतिनिधी

[illegible]



[illegible]

**Lokmat 16.05.20**



**कारवाई...:** लॉकडाऊन असताना विनाकारण फिरणाऱ्या दुचाकीचालकांवर पोलीसांनी कारवाई करण्यात येते. स. प. महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर पोलीस संबंधित वाहनचालकांवर कारवाईची कार्यवाही पुर्ण करीत आहेत.

**Lokmat 06.06.20**

# पुणे पोलिसांतर्फे 'व्ही अपॉइंटमेंट' सुविधा

## आजपासून प्रायोगिक सुरुवात

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : नागरिकांना आयुक्त कार्यालयात किंवा पोलीस ठाण्यात टाळेबंदीच्या दरम्यान येण्यास बंदी होती; मात्र लोकांच्या अडचणी समजावून घेण्यासाठी नागरिकांना आयुक्त कार्यालयात व्हर्च्युअल माध्यमांतून संवाद साधण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली असल्याची माहिती पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुणे पोलिसांच्या संकेतस्थळावर अडचणी असलेल्या नागरिकांना व्ही (व्हर्च्युअल) अपॉइंटमेंट या सुविधेच्या माध्यमातून आपल्या अडचणी मांडता येणार आहेत. उद्यापासून (शनिवार) हा उपक्रम प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार आहे.

जो कालावधी तक्रार मांडण्यासाठी निश्चित करण्यात आली आहे, त्या वेळेत दिलेला टोकन नंबर व्ही अपॉइंटमध्ये दिलेल्या ऑप्शनमध्ये टाकून तुम्हाला ऑनलाइन तुमची तक्रार मांडण्यात येणार आहे.

यावेळी नागरिकांना त्यांच्याकडील कागदपत्रेदेखील अपलोड करण्याची सुविधा देण्यात आली आहे. व्ही अपॉइंटमेंट या सुविधेच्या माध्यमातून वेळ घेणाऱ्या नागरिकाला किंवा तक्रारदाराला त्यांच्या तक्रारीचे निरसन झाल्याबाबत सेवा प्रणालीच्या माध्यमातून विचारपूस करण्यात येणार आहे. नागरिकांनी नोंदविलेल्या सकारात्मक आणि नकारात्मक मतांची नोंदही ठेवण्यात येणार असून, त्याद्वारे सुविधा सक्षम करण्याकडे भर देण्यात येणार आहे.

व्ही अपॉइंटमेंट नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीसाठी सुविधेसाठी नाही. आपत्कालीन सुविधेसाठी पुणे पोलिसांकडून देण्यात आलेले तातडीचे (उदा. १०० नंबर) नंबर आपत्कालीन सुविधा नेहमीप्रमाणे उपलब्ध आहे. व्ही अपॉइंटमेंट ही पोलीस उपायुक्त बच्चन सिंह, पोलीस उपनिरीक्षक कपिल भालेराव यांनी ही यंत्रणा विकसित केली आहे. व्ही अपॉइंटमेंटसाठी डेक्कन, लष्कर, कोंढवा, कोथरुड आणि चतु:शृंगी ही पाच पोलीस ठाणी निवडली आहेत.

पोलीस उपायुक्त, सहायक पोलीस आयुक्त, क्राइम ब्रांच, ट्रॅफिक ब्रांच यामध्यमातून नागरिकांना व्ही अपॉइंटमेंटसाठी पुणे पोलिसांच्या संकेतस्थळावर जाऊन तेथे थोडी माहिती भरून द्यावी लागेल. त्यानंतर तुम्हाला निश्चित करण्यात आलेली वेळ आणि टोकन क्रमांक मिळणार आहे.

**Lokmat 23.06.20**

# सोसायटीत जाण्यासाठी मार्गदर्शक सूचना जारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी शहर पोलीस दलाने सोसायट्यांसाठी मार्गदर्शक नियमावली तयार केली आहे. या नियमावलींचे पालन सोसायटी व तेथे राहणाऱ्या रहिवाशांनी करावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. या नियमावलीमध्ये प्रवेशद्वाराचे नियमन कसे करावे, जीवनावश्यक वस्तू विक्रेते, कामगार, कुरियर पुरविणारे कामगार, याबाबत नियम नमूद आहे.

## प्रवेशद्वारावरील नियमन

- सोसायटीत प्रवेश करताना मास्कचा वापर करणाऱ्यांनाच आत प्रवेश द्यावा. प्रवेशद्वाराजवळ व लिफ्टजवळ वॉश बेसीन, हँड सॅनिटायझर स्टँड बसवावे.
- फ्लिट, स्वच्छतागृह, जिना सॅनिटायज करावे.
- प्रवेश करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची थर्मल मशीनद्वारे शरीराचे तापमान मोजावे. ऑक्सिमिटर मशीनमध्ये तपासणी करुन ९५ पेक्षा कमी पातळी असल्यास संबंधित व्यक्तीची तपासणी करावी.
- सोसायटीच्या परिसरात वावरताना २ मीटरचे अंतर राखावे. गर्दी करून नये. परदेशातून किंवा इतर प्रांतातून आलेल्या व्यक्तीच्या बाबतीत विलगीकरणाच्या सूचनांचे खात्री करुन अंमलबजावणीकडे लक्ष द्यावे. घरकाम करणारी व्यक्ती घरात येईल, तेव्हा तिला एक कापडी बॅग व्यक्तिगत वस्तू ठेवण्यासाठी द्यावी. हात, तोंड चेहरा साबणाने स्वच्छ धुवायला सांगावे, या व्यक्तींनी मास्क वापरणे बंधनकारक करावे.
- दुध, भाजीपाला, वृत्तपत्र व अन्य विक्रेते, सफाई कामगार, घरकाम करणाऱ्या महिला यांची प्रवेशद्वारावर दररोज स्क्रिनिंग टेस्ट व सॅनिटायझेशन केल्यावरच सोसायटीत प्रवेश द्यावा. घरकाम करणाऱ्या महिला, सुरक्षा रक्षक, वाहनचालक प्रतिबंधित क्षेत्रात राहणारे नसावेत. पावसाळी दुरुस्ती व्यतिरिक्त इतर कोणतीही कामे करण्यास प्रतिबंध करावा.
- नवीन बांधकाम व नुतनीकरणाच्या कामास परवानगी देऊ नये.

## विशेष दक्षता

- कोरोना संक्रमित रुग्ण व कुटुंबीयांशी दुर्व्यवहार करु नये
- उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, हृदय विकार असलेल्यांची विशेष काळजी घ्यावी

**Pudhari 06.06.20**

# पोलिसांकडून 'व्ही अपॉइंटमेंट'ची सुविधा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**


आयुक्त कार्यालयात किंवा पोलिस ठाण्यात प्रवेशास मनाई करूनही लोकांच्या अडचणी समजून घेण्यासाठी आयुक्त कार्यालयात व्हर्च्युअल माध्यमांतून संवाद साधण्याची व्यवस्था नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

पुणे पोलिसांच्या वेबसाईटवरील 'व्ही (व्हर्च्युअल) अपॉइंटमेंट' या सुविधेच्या माध्यमातून शनिवारपासून हा उपक्रम प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार आहे, अशी माहिती पोलिस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी पत्रकार परिषदेत दिली

व्ही अपॉइंटमेंट ही यंत्रणा पोलिस उपायुक्तबच्चनसिंह, पोलिसउपनिरीक्षक कपील भालेराव यांनी विकसित केली आहे. 'व्ही अपॉइंटमेंट'साठी पुणे पोलिस आयुक्तालयाअंतर्गत पाच पोलिस ठाणी निवडण्यात आली आहेत. त्यामध्ये डेक्कन, लष्कर, कोंढवा, कोथरूड आणि चतु:श्रृंगी पोलिस ठाण्यांत हा उपक्रम कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यानंतर पोलिस उपायुक्त, सहायक पोलिस आयुक्त, क्राईम ब्रँच, ट्रॅफिक ब्रँच या माध्यमातून नागरिकांना 'व्ही अपॉइंटमेंट'साठी पुणे पोलिसांच्या संकेतस्थळावर जाऊन तेथे सुरुवातीला थोडी माहिती भरून द्यावी लागणार आहे. त्यानंतर तुम्हाला निश्चित करण्यात आलेली वेळ आणि टोकन क्रमांक मिळणार आहे. जी वेळ तक्रार मांडण्यासाठी निश्चित करण्यात आली आहे त्यावेळेत दिलेला टोकन नंबर 'व्ही अपॉइंटमेंट'मध्ये दिलेल्या 'ऑप्शन'मध्ये टाकून तुम्हाला ऑनलाईन तक्रार मांडता येणार आहे. यावेळी नागरिकांना त्यांच्याकडील कागदपत्रेदेखील अपलोड करण्याची सुविधा देण्यात आली आहे. 'व्ही अपॉइंटमेंट' या सुविधेच्या माध्यमातून वेळ घेणाऱ्या नागरिकाला किंवा तक्रारदाराला त्यांच्या तक्रारीचे निरसन झाल्याबाबत सेवा प्रमाणीच्या माध्यमातून विचारपूस करण्यात येणार आहे. नागरिकांनी नोंदविलेल्या सकारात्मक आणि नकारात्मक मतांची नोंदही ठेवण्यात येणार असून, त्याद्वारे सुविधा सक्षम करण्याकडे भर देण्यात येणार आहे. व्ही अपॉइंटमेंट नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत सुविधेसाठी नाही. आपत्कालीन सुविधेसाठी पुणे पोलिसांकडून देण्यात आलेले तातडीचे (उदा. १०० नंबर) नंबर नेहमीप्रमाणे उपलब्ध आहेत.

**Prabhat 03.06.20**

# लॉकडाऊनमधील जप्त वाहने परत मिळणार




प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २ - लॉकडाऊन काळातील नियमांचे उल्लंघन केले म्हणून जप्त केलेली वाहने मालकांना परत करण्यात येणार आहेत. दुचाकीला दीड आणि चारचाकीला अडीच हजार रुपये अनामत रक्कम आणि हमीपत्र जमा करून वाहन परत नेता येणार आहे. त्या बाबतचे परिपत्रक पोलिसांनी काढले आहे. शहरातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीत अशी हजारो वाहने पडून आहेत.

लॉकडाऊन काळात विनाकारण घराबाहेर पडले किंवा पोलीस पास नसताना प्रवास केला म्हणून पोलिसांनी लॉकडाऊन काळात सुमारे ४५ हजार वाहने जप्त केली. अनलॉकचा पहिला टप्पा सुरू झाल्याने अनेक नियम शिथिल केले आहेत. त्यामुळे संबंधित वाहनचालकांना त्यांच्या गाडीची गरज भासणार आहे. या सर्वांची गैरसोय टाळण्यासाठी पोलिसांनी या गाड्या परत देण्याचे ठरवले आहे. मात्र, त्यांच्यावर न्यायालयीन प्रक्रिया केली जाणार असून केवळ त्या जप्त केल्या जाणार नाहीत.

> “ वाहन परत देण्याची प्रक्रिया सोमवारपासून सुरू झाली आहे. ज्यांचे वाहन जप्त केले आहे त्याने संबंधित पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षकाशी संपर्क साधावा. अर्ज व अनामत रक्कम दिल्यानंतर त्वरित त्यांचे वाहन परत दिले जाणार आहे.
>
> डॉ. संजय शिंदे, अतिरिक्त पोलीस आयुक्त

**...अशी असेल प्रक्रिया**

वाहन ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत जप्त केले आहे. तेथील, पोलीस निरीक्षकास वाहनचालकाने आपले वाहन परत मिळण्याबाबत अर्ज करायचा आहे. अर्जासोबत हमीपत्र देऊन दुचाकीसाठी अनामत रक्कम पोलिसांकडे जमा करावी आहे. त्यांनतर वाहन परत मिळणार आहे.

**Pudhari 06.06.20**

# ‘भरोसा सेल’वर महिलांचा भरोसा

## ७५० तक्रारींपैकी २५० प्रकरणांत समुपदेशन

पुणे : महेंद्र कांबळे

कौटुंबिक कलह विकोपाला गेल्यानंतर महिलांनी पुणे पोलिसांच्या भरोसा सेलकडे जानेवारीपासून सुमारे ७५० तक्रारी केल्या. त्यातील २५० तक्रारींमध्ये समुपदेशन केल्याने महिलांचा भरोसा या शाखेने मिळवला, असे म्हणता येईल.

लॉकडाऊन काळात आलेल्या १७१ तक्रारींपैकी २१ तक्रारी महिला आयोगाकडून आल्या आहेत. त्यापैकी ९ तक्रारी संबंधित पोलिस ठाण्याकडे पाठविल्या आहेत.

लॉकडाऊन कालावधीतही पुणे पोलिसांचे भरोसा सेल उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या मदतीने कौटुंबिक हिंसाचार प्रकरणात फोनद्वारे समुपदेशन करीत आहे. भांडणे विकोपाला जात असतील तर यामध्ये हस्तक्षेप करण्यासाठी जवळच्या पोलिस ठाण्याची मदत त्यांना देण्यात येत आहे. गर्दी होऊ नये यासाठी कार्यालय बंद ठेवले आहे; मात्र काही कर्मचारी, अधिकारी जबाबदारी पार पाडत आहेत.

पुढारी अँकर

**घटना क्रमांक १** - राष्ट्रीय महिला आयोगाकडून आलेल्या एका प्रकरणात पती हा खासगी नोकरी करीत आहे. पत्नी ही उच्चशिक्षित असून ती गृहिणी आहे. दोघांमध्ये किरकोळ कारणावरून खटके उडू लागल्याने एक दिवस पतीने पत्नीला मारहाण केली. याची थेट तक्रार पत्नीने महिला आयोगाकडे केल्याने प्रकरण भरोसा सेलकडे आले. संबंधित महिलेला फोनद्वारे संपर्क साधून, तिला समजावून सांगण्यात आले. परंतु, महिला ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हती. ती गुन्हाच दाखल करण्याची मागणी करीत होती. या प्रकरणात महिला तडजोडीस तयार नसल्याने शेवटी हे प्रकरण संबंधित ठाण्याकडे पाठविण्यात आले.

---

**घटना क्रमांक २** - एक अविवाहित मुलगी होती. मुंबई येथे तिची सावत्र आई तिला त्रास देत असल्याने ती मुंबईहून पुण्यात नोकरीच्या शोधात आली असता ती लॉकडाऊनमध्ये अडकली. तिला राहायची सोय नव्हती. तिचा भाऊही येत नसल्याने तिने शेवटी पुणे पोलिसांशी संपर्क साधला. त्यानंतर हे प्रकरण संबंधित पोलिस ठाण्याकडे वर्ग करून तिची वैद्यकीय तपासणी करून डिजिटल पास देत मुंबईस खासगी गाडीने रवाना केले.

---

**घटना क्रमांक ३** - विदर्भातील एका महिलेला लॉकडाऊनमध्ये तिचा पती मारहाण करीत होता. सासरच्यांनी तिला मारहाण करून तीन महिन्यांच्या बाळासह घराबाहेर काढले होते. तिच्या आईने नागपूर येथून प्रवास करण्यासाठी एजंट मार्फत गाडीही बुक केली होती. या प्रकरणात समुपदेशन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु, यातून मार्ग निघत नसल्याने शेवटी महिलेला तत्काळ पास देऊन माहेरी पाठविले.

**Lokmat 01.06.20**

# ८३ टक्के पुणेकरांची पोलिसांच्या कामाला पसंती

## पोलिसांच्या सर्व्हेला २२ हजारांहून अधिक पुणेकरांचा प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे शहर पोलीस दलाने कोविड -१९ बाबत एक सर्व्हे हाती घेतला होता. यामध्ये सहभागी होण्याचे पुणेकरांना आवाहन करण्यात आले होते. त्याला २२ हजार ७९१ पुणेकरांनी प्रतिसाद देऊन या सर्व्हेत सहभाग घेतला. त्यातील ८३ टक्के पुणेकरांनी लॉकडाऊनच्या काळात पुणे पोलिसांनी केलेल्या कामावर आपल्या पसंतीची मोहर उमटविली आहे.

लॉकडाऊनच्या काळात शहरातील नागरिकांना कोणत्या कारणांसाठी सर्वाधिक वेळा घराबाहेर पडावे लागते, त्या समस्या समजून घेऊन त्या कशा सोडविता येतील, याचा आराखडा तयार करण्यासाठी शहर पोलीस दलाकडून ऑनलाइन सर्व्हे केला गेला. त्याचबरोबर कोरोना विषाणूचा प्रसार कोणत्या मार्गाने कमी करता येईल, हे जाणून घेण्यासाठी हा सर्व्हे केला गेला. पोलिसांनी या सर्व्हेत सहभागी होण्याचे १९ मे रोजी आवाहन केले होते.

या सर्व्हेमध्ये नागरिकांच्या नेमक्या कोणत्या गरजा आहे, ते कोणत्या कामासाठी जास्त वेळा घराबाहेर पडत आहेत, ही गरज व त्यांच्या अडचणी कशा सोडविता येतील हे जाणून घेण्यासाठी हा सर्व्हे घेण्यात आला. या ऑनलाइन सर्व्हेमध्ये २२ हजार ७९१ पुणेकरांनी भाग घेऊन आपली मते मांडली. पुणेकरांच्या या प्रतिसादानंतर आता हा सर्व्हे बंद करण्यात आला आहे.

### सूचनांचे विश्लेषण करण्याचे काम हाती

- लॉकडाऊनमध्ये अडकलेल्या गोरगरिबांना मोठ्या प्रमाणावर फूड पॅकेटवाटप, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, मजुरांना त्यांच्या गावी जाण्यासाठी सर्व प्रकारची मदत पोलिसांनी केली. पोलिसांनी केलेल्या या कामावर ८३ टक्के लोकांनी आपली पसंती दिली आहे.
  पुणेकरांनी दिलेली माहिती आणि केलेल्या सूचनांचे विश्लेषण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

> “ पुणेकरांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल आभार. सध्या आम्ही डेटाचे विश्लेषण करीत आहोत. पुणेकरांनी दिलेली माहिती आणि सूचनांचा उपयोग करुन कार्यक्षम नियोजन व अंमलबजावणी करणार आहोत. येत्या दोन दिवसांत हा रिपोर्ट सर्वांसमोर ठेवण्यात येईल.



- डॉ. के. व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे